# १. पहिली आठवण

आज मी जुन्या-नव्या आठवणी सांगायला घेतल्याहेत - शक्य तो कालक्रमानुसार. पहिली आठवण कोणती? जुन्यांत जुनी कोणत्या वयातली असू शकते? अनेकांना विचारलं. साधारणपणे चौथ्या पाचव्या वर्षापासूनच्या आठवणी सगळ्यांना असतात. बाबा (दे.ना.टि.) म्हणायचे, 'आईच्या अंगावर प्यायल्याची मला आठवण आहे.' पण ती त्यांच्या तान्हेपणाची नव्हती. त्यांचा धाकटा तान्हा भाऊ वारला तेव्हाची, म्हणजे यांच्या वयाच्या तिसऱ्या चौथ्या वर्षीची.

प्रख्यात अंध-मूक-बधिर विदुषी हेलन केलर वयाच्या २६ व्या महिन्यात अंध झालेल्या. तत्पूर्वी त्यांनी पाहिलेली हिरवी कुरणं त्यांना शेवटपर्यंत आठवत होती.

मीही मग शोध घेत घेत मागे मागे निघालो. दुधाच्या बाटलीवरून बहिणीशी होणारी भांडणं आठवली. मीरा माझ्यापेक्षा सवा वर्षानं धाकटी. म्हणजे या भांडणसमयी मी सवादोन-अडीच वर्षांचा असणार. त्या वेळी आजीबाईंनी मला उपदेश करायला शिकवलं होतं. एक भली मोठी काळी पेटी होती. तिच्यावर चढून उभं राहायचं. ताठ उभं राहून तर्जनी वर करून मोठ्यानं म्हणायचं - 'भावांनो आणि बहिणींनो, बाऽटलीनं दूध पिऊ नका. कां, की, तुमचे दात पडतील'... आणि लगेच खाली उडी मारून बाटलीसाठी हिसकाहिसक सुरू करायची.

याहूनही पुरातन 'एपिसोड' आठवतो. आम्ही सगळीजणं बोटीवर चढलेलो आणि धक्क्यावर उभे चार आठ जण हात हालवून निरोप देताहेत. सगळेजण अगदी स्पष्ट आठवतात. आज जरी समोर उभे केले तरी मी त्यांना सहज ओळखेन.

कठड्यामधून हळूच पाय बाहेर काढून हाताऐवजी पायानं टाटा करायला मी सुरूवात केली. बाबांनी दम दिला 'तुझा एक बूट खाली पडला तर दुसरा पण फेकून देईन'. मी घाबऱ्या घाबऱ्या पाय मागे घेतला.

५०-६० वर्षानंतर जुनी रद्दी चिवडतांना तपशील सापडला. तेव्हा आम्ही कराचीला निघालो होतो. भास्करराव व मनोहरराव उजगरे, बेंजीमामा कुकास, लाजरसराव पडाळे निरोप देत होते. ती तारीख होती २३ डिसेंबर १९२२. आणि माझं वय होतं एक वर्ष, सहा महिने, चोवीस दिवस फक्त.

## २. कानकाप्या

गोष्ट फार जुनी. पाऊण शतकामागली. पण ती आठवली की आजही हा वृद्ध बाहू स्फुरण पावतो. तेव्हा मी असेन जेमतेम तीन वर्षांचा. पण भारी द्वाड. दिवसभर दंगामस्ती करून बिचाऱ्या आजीबाईंना सारखा सतावायचा. पण त्यांना एक भला रखवाला भेटला. शेजारीच राहणारा गलेलठ्ठ पोटाचा 'कानकाप्या'.

'बोलावू का कानकाप्याला?' शब्द म्हातारीच्या तोंडून बाहेर पडतात न पडतात तो कानकाप्या हजर व्हायचा, कमरेला भली मोठी सुरी लटकावून. मात्र मला त्या सुरीपेक्षा त्याच्या भल्या मोठ्या पोटाचंच भय वाटायचं. बाबांना हा प्रकार पसंत नव्हता. त्यांनी मला एकान्ती गाठून गुरूमंत्र दिला, 'अरे तो कानकाप्या काय करतो? त्याला म्हण 'ये तुझाच कान कापतो!'.

गुरूमंत्र राबवण्याची संधीही लौकरच मिळाली. अंगणात दहाबारा पत्रे एकावर एक रचून ठेवलेले होते. मला अचानक शोध लागला की यावर उडी मारली म्हणजे छानदार कर्कश्श आवाज होतो. मग मी आणि मागोमाग शेजारपाजारच्या डझनभर पोरांनी उड्या मारायचा सपाटा लावला.

आजीबाई घरात नव्हत्या तरी तो द्वाड कानकाप्या आपल्याच अधिकारात आम्हाला दटावायला आला, तसा मी 'ये तुझाच कान कापतो' म्हणत आवेशाने त्याच्या अंगावर धावून गेलो. मागोमाग सारी पिट्टुकली वानरसेना! कानकाप्याला पळता भुई थोडी झाली.

दोन दिवसांनी बघतो तो हाच कानकाप्या अगदी गलितोत्साह होत्साता आजीबाईंना म्हणत होता, 'काय सांगावं आजीबाई, पोरंच ती. एखाद वेळी खराच कान कापून टाकायची!'.

## ३. सत्याग्रह

सत्याग्रह, बहिष्कार, असहकार वगैरे मौलिक शब्दांचा सवंगसंचार सुरू होण्याच्या आधीची ही गोष्ट. वयाच्या चौथ्या वर्षी सत्याग्रह शब्द मी प्रथम ऐकला आणि यशस्वीपणे आचरिला (आजचा शब्द - राबविला).

मी अगदी लहान असताना कोणी एक हरणाबाई आमच्याकडे कामाला होती. मला ती आठवत नाही. पण तिच्या लाडामुळे माझं 'अशोक' हे नाव मागे पडून 'सोन्या' नांव रूढ झालेलं होतं, एवढं मला ऐकून माहीत आहे.

बाबांना हे नामान्तर मंजूर नव्हतं. पण त्या काळी बाबा मुंबईत आणि आम्ही नाशिकला. सातआठ दिवसांनी त्यांची फेरी यायची. यामुळे त्यांचा प्रभावही आमच्यावर बेताचाच पडायचा. पण एका भेटीच्या वेळी त्यांनी मला सत्याग्रहाची दीक्षा दिली, 'अशोक, तू आता सत्याग्रह करायचा. कोणी 'सोन्या' म्हणून हाक मारली तर ओ द्यायची नाही. उलट ठणकावून म्हणायचं, 'कोण सोन्या? माझं नाव अशोक आहे.'

लगेच माझा सत्याग्रह सुरू झाला. कोणी अगदी कानाशी सोन्या म्हणून ओरडलं तरी ओ मिळायची नाही. एकदा तर खुद्द बाबांनाही जवाब मिळाला, 'कोण सोन्या? माझं नाव अशोक आहे.' आजीबाईंची 'नाना-सोन्या-मीरा-अशोओक' अशी संयुक्त हाक आली तर मात्र निरूपाय व्हायचा.

तीन दिवस सत्याग्रह चालला आणि सोन्याचा मुलामा पार उतरून निखळ अशोक बाकी उरला. तो आजतागाईत कायम आहे.

## ४. प्रवास पोष्टाने

गोष्ट फार जुनी. आमचे बाबा मुंबईस आणि आम्ही तिघं चिमणी बाळं नाशिकला आई-आजींच्या पंखाखाली होतो तेव्हांची. सर्वसामान्य मुलांसारखीच आम्ही दोघींकडे लाड घालीत असूं, हट्ट घेत असूं. खासकरून माझे हट्ट पुरवायला आई फारशी उत्सुक नसायची. कधी रागावून कधी माराचा धाक घालून ती मला गप्प करायची. आजींची गोष्ट वेगळीच. आजीबाई प्रतिभासंपन्न. पोरांचे लाड पुरवण्यात नाही तरी शमविण्यात हातखंडा.

मला आठवतं एकदा मी हट्ट घेतला होता 'मला बाबांकडे मुंबईला जायचं!' सकाळपासून माझा धोशा चालला होता. शेवटी आजीबाईंना दया आली. त्यांनी म्हटलं, 'बरं चल, तुला तुझ्या बाबाकडे धाडते'. आमची तयारी झाली. तयारी म्हणजे दुसरं काही नाही. माझ्या कपाळावर पोष्टाचें तिकीट - अर्थात् जुनंच - डकवण्यात आलं. माझा हात धरून आजीबाई पोष्टाकडे निघाल्या. वाटेत भेटेल त्याला त्यांनी म्हणावं 'हा बापाकडे मुंबईला चाललाय - पोष्टानी!'.

नाशिकचं पोष्ट ऑफीस आज आहे तिथंच होतं. मात्र जरा प्रिमिटिव्ह स्वरूपाचं. टपालपेटी भली मोठी, ओबडधोबड, अघळपघळ! तिचं तोंड सदा वासलेलं. पेटीजवळ आलो. आजीबाई मला उचलायला गेल्या - तो मी पसार! पोष्टातून जी धूम ठोकली ती थेट घरी. पलंगाच्या खाली जाऊन लपलो.

तेव्हापासून आजतागाईत मी कधीही पोष्टानं कुठं जायचा विचार डोक्यात आणला नाही - आणणार पण नाही.

## ५. अनुदिन अनुतापे तापलो रामराया

गोष्ट जुनी. बाबांनी वकिली सुरू केली त्या वर्षीची. म्हणजे १९२७ सालची. आमच्या शेजारी शेखकाका राहायला आले. मला वाटतं ते फॉरेष्ट मधे काही मोठ्या हुद्दयावर असावे. कचेरीला - हो 'कचेरीलाच'. काका 'ऑफीस' कधीच म्हणत नसत. त्या जुनाट इमारतीला आम्ही अजूनही 'काकांची कचेरी'च म्हणतो-जाणंयेणं टांग्यानं. बरोबर नारायण पट्टेवाला. दप्तर पट्टेवाल्याच्या हातात. काकांचा पेहराव बिल्कुल मुसलमानी. लांबच लांब काळा कोट आणि डोईवर काळ्या गोंड्याची ती तांबडी फेझक्याप. शिस्त कडक. दरारा मोठा.

घरी आल्यावर अवतारच वेगळा. स्वच्छ मराठी बोलणं. रोज सकाळी दासबोध-वाचन. कधी एखादा मोडी कागद लागत नसला की बाबांनी काकांकडे धाव घ्यावी. आजीबाईंचाही काकांवर भरवसा. कधी कुणी - कुणी म्हणजे मीच - दांडगाई केली की त्यांनी काकांना पुकारावं. काकांनी येऊन रागं भरावं आणि गालफडीत मारून घेऊन 'थोबा थोबा' करायला लावावं. अशी घसट.

एकदा सकाळीच नाना काकांच्या घरी गेला. त्यांचा तेव्हा नित्यपाठ चालला होता. त्यांनी नानाला 'अनुदिन अनुतापे तापलो रामराया' हा श्लोक शिकविला. नानानं धावत घरी येऊन तो मला पढवला आणि आम्ही दोघे 'रामराया' ऐवजी 'ख्रिस्तराया' घालून मोठमोठ्यानं श्लोक म्हणत सुटलो.

तो ऐकून बाबांनी आम्हा दोघांना जवळ बोलावून समजावून सांगितलं - 'रामराया' च्या जागी 'ख्रिस्तराया' करणं रास्त नव्हे. तशानं कवीवर अन्याय होतो'. 'रास्त' आणि 'अन्याय' दोन्ही शब्द कदाचित् त्यांनी म्हटले नसतील. पण मतलब तोच होता. आम्हीही समजूत घेतली आणि 'अनुदिन अनुतापे तापलो रामराया' च्या घोषानं घर दणाणून सोडलं.

## ६. माझा संगीत व्यासंग

मला वाटतं हे प्रसिद्ध संगीतज्ञ गोविंदराव टेंबे यांच्या आत्मचरित्राचं नाव असावं. नक्की आठवत नाही. पण माझा संगीत व्यासंग म्हणताच मला आठवतं ते काही निराळं.

खरं सांगायचं तर मला संगीतात गम्य काहीही नाही. लहानपणी मोठमोठ्यानं आरडत कविता म्हणून घर डोक्यावर घेत होतो ती बात अलाहिदा. आज मात्र एखादे वेळी वाईट वाटतं. हे आपलं राहिलंच. एवढी एक गोष्ट शिकलो असतो तर! तसं गाणं कानाला गोड वाटतं, ऐकतांना बरं वाटतं. पण गायन ऐकून भले भले माना डोलावतात, तल्लीन होऊन जातात, भान विसरतात. हे माझ्या नशिबात नाही. लहानपणीच शिकायला हवं होतं.

आणि तसा मौका मिळालाही होता. बाबांनी आपल्या तिघा गोजीरवाण्या बाळांना संगीत शिकवायला रानडे मास्तर नामक गवईबुवांची नेमणूक केली होती. बुवा हौशी. पण बाबांनी आधी बोली सोडवून घेतली, 'आठ दिवस शिकवून बघा. पोरांची काही गती दिसली तर पुढे चालू, नाहीतर जाऊ द्या.'

शिकवणी सुरू झाली. बुवांनी खरोखर जीव तोडून शिकवायची धडपड केली, आणि आठ दिवसांनी रिपोर्ट सादर केला - 'नाना काहीही शिकला नाही, आणि मीराताई पण काही शिकली नाही.'

'आणि अशोक?'

'हो, अशोक हातवारे तेवढे शिकला.'

## ७. अन् अण्णांना कळलं तर !

जुने प्रख्यात वकील बापूसाहेब - आडनाव राहू द्या - यांच्या आयुष्यात घडलेली ही दारूण घटना. त्या वेळी ते प्रख्यात नव्हते आणि वकीलही नव्हते. त्या काळी हा बापू होता एक सरळमार्गी हुशार आणि अभ्यासू विद्यार्थी, लॉ कॉलेजात नुकताच दाखल झालेला. गोष्ट पन्नास वर्षांमागली. पण त्या जमान्यातही कॉलेजांमधून खट्याळ खोडकर पोरांची टोळकी वावरायची आणि साध्याभोळ्या (म्ह. बावळट) स्कॉलर्सना जीव नकोसा करायची. परंपरा सनातन आहे.

त्या वर्षी एका असल्या टोळक्यानं महाशिवरात्र साजरी करायचा बूट काढला. नको नको म्हणून गयावया करणाऱ्या बापूलाही खेचून घेतलं. जोरदार आग्रह करून यथास्थित शांभवी सेवन करायला भाग पाडलं.

इथपर्यंत निभावलं. पण आतां? रात्री अण्णांना संशय आला तर? बापूची पाचांवर धारण बसली. पण सन्मित्रांनी धीर दिला - 'अरे काही कळायचं नाही कोणाला ! आपण चोख बंदोबस्त करू. तू असं कर, रात्री झोपू नको, अभ्यास करीत बस. मोठ्यांदा वाचन चालू ठेव म्हणजे शंका नाही यायची कोणाला.'

नुसती सल्लामसलत देऊन मंडळी थांबली नाही, बापूला धरून त्यांनी खुर्चीमधे नीट बसवून दिलं. सगळ्यांत जाड दिसलं ते लॉ पुस्तक त्याच्या मांडीवर उघडून ठेवलं - 'हं, चालू दे तुझा अभ्यास, आम्ही चाललो आता.'

बापूला आता धीर आला. तो वाचायला लागला. रात्रभर मोठ्यानं वाचीतच राहिला.

दिवा लावायचं तेवढं विसरला होता.

## ८. 'इश्श' गेला 'अय्या' आला

हा 'अय्या' तुम्हा सगळ्यांच्या ओळखीचा आहे. पण हा मुळचा कोण? कुठला? याचा आगापिच्छा व्युत्पत्ति कोशातही सापडायचा नाही. पण हा दाक्षिणात्य 'अय्यय्यो'चा वंशज मराठीत कुठून शिरला याची कहाणी मला माहीत आहे.

गोष्ट जुनी. ६०-६५ वर्षांमागची. त्या जमान्यात स्त्रीशिक्षण जेमतेमच असायचं. जिल्ह्याजिल्ह्यात ए.व्ही.गर्ल्स स्कुलांमधे मुलींची संख्या पहिली यत्तेत ३० आणि चौथीत म्हणजे आजच्या आठवीत १५ नाहीतर १६. दरवर्षी किमान चारपाच जणींची सासरी बोळवण झालेली असायची.

मुंबईच्या सेंट कोलंबा गर्ल्स स्कूलचं नाव फार मोठं होतं. ती शाळा आणि बोर्डिंग ख्रिस्ती मिशनाची. पण विद्यार्थिनी बहुसंख्य 'हिंदु कन्या श्रीमान कुलीनांच्या'. आणि यांची बोलभाषा इतर शाळांतल्या मुली उचलायच्या. नकळत म्हणा फ्याशन म्हणून म्हणा.

आमच्या 'अम्मा' तिथं कित्येक वर्षं मेट्रन होत्या. यांचं खरं नाव मिसेस रामदास रेड्डी. जवळची ओळख सांगायची तर आपल्या डॉ. रामदासांच्या माताजी. मराठी चांगलं बोलायच्या. मात्र लकब जराशी कानडी. एखादी मुलगी ४-६ दिवसांच्या अवधीनंतर

भेटली की तिचं स्वागत व्हायचं - 'अय्या, कशी आहेस बेटा?' किंवा 'अय्या, कधी आलीस बेटा?' या शब्दांनी.

अम्मांचा 'अय्या' मुलींनी उचलला. 'बेटा' सोडून दिला. आणि तो 'अय्या' असा काही उंच उचलला की त्यानं प्रस्थापित 'इश्श' ची पार उचलबांगडी करून टाकली. बाकी इश्श पेक्षा अय्याचा आवाका दांडगा. 'इश्श' बापडा सौम्य निषेध तेवढा नोंदवायचा, 'अय्या' तर रमणींचे एकूण एक भावना-विभ्रम व्यक्त करून जातो.

## ९. जग्या

तुम्हाला जग्या आठवतो का? नाही म्हणतां? मग फार लहान आहांत. आमच्या वयाच्या नाशिककरांना जग्या आठवत असलाच पाहिजे. गोष्ट ही साठपासष्ठ वर्षांमागली. हा जग्या एक अत्यंत गलिच्छ पोरगा. १२-१३ वर्षांचा. कोणाचा कोण, जातकुळी, आगापिच्छा काही माहीत नाही. माहीत आहे ते एवढंच की त्याला साप धरायची युक्ती अवगत झालेली होती. मोठमोठाले साप हा पकडायचा आणि गावातला एक मवाली त्याला हाताशी धरून लोकांकडून आणा-पैसा उपटीत फिरायचा.

एकदा जग्या शांतिसदनात घुसला. बाबा कुठं बाहेर गेलेले होते. आम्ही आई आणि पोरंटोरंच घरात होतो. जग्या घरात घुसला. त्याचा दिग्दर्शक बाहेरच उभा होता. आत येऊन जग्या ऐटीत आरामखुर्चीवर बसला आणि आपल्या हातातला भला मोठा साप त्यानं जमिनीवर सोडून दिला. आम्ही सगळे घाबरलो. नानानं हळूच एक पैसा आणून जग्यापुढे सरकवला.

इतक्यात बाबा आले. त्यांनी एका हातानं तो साप उचलला आणि दुसऱ्या हातानं जग्याचा कान पकडून दोघांना फरफटत बाहेर नेऊन टाकलं. जग्यानं आणि त्याच्या रक्षकानंही सूं पळ काढला. तेव्हांपासून त्या दैवी पुरूषानं बाबांची एवढी धास्ती घेतली की रस्त्याने कुठं बाबा दिसले की त्यानं आपला साप घेऊन पळच काढावा.

## १०. पोपटाची साक्ष

१९३३-३४ सालची गोष्ट. नाशिक तेव्हा महानगर नव्हतं. एक साधासुधा जिल्ह्याचा गाव होता. विजेचे दिवे नुकतेच कुठं कुठं चमकू लागले होते. रस्ते बहुतेक

सगळे धुळीचे. त्यांवरही रहदारी फारशी नसायची. सारं काही संथ चालायचं. जणू काही स्लो मोशन पिक्चर.

मात्र प्रतिभाशाली थापेबाजांचं पीक तेंव्हा सुद्धा अमाप होतं. एकदा सकाळीच बातमी उठली 'आज कोर्टात पोपटाची साक्ष आहे!' लगोलग तपशीलही तयार झाला. 'कुणी एक बडा साहेब मुंबईहून फर्स्ट क्लासनं निघाला. डब्यात एकटाच होता. कसारा-इगतपुरी दरम्यान त्याचा खून झाला. साहेबाबरोबर दुसरं माणूस कोणी नव्हतं. होता तो त्याचा लाडका पोपट. इगतपुरीला गाडी थांबताच पोपट् बाहेर पडला. टिकिटबाबूच्या खांद्यावर बसून त्याला विचारू लागला - " *Where is the Station Master?*" मास्तरांची भेट घेऊन पोपटानं त्यांना सारी हकीगत सांगितली. आज कोर्टांत खटला उभा राहायचाय्.'

पहाटपासून कोर्टाच्या आवारात खेड्यापाड्यांतून बघ्यांची गर्दी लोटली. कुणीकुणी पथाऱ्याही पसरल्या. अगदी कुर्डुवाडीचा प्ल्याटफॉर्म झाला. कोणी कितीही समजावून सांगितलं तरी लोकं ऐकत ना! 'आमाला तो पोपट एकवार निसता दावा. आमी जातो.' संध्याकाळपर्यंत हेच चाललं होतं.

शेवटी बातमी उठली की 'गर्दी फार झाली म्हणून पुढली तारीख दिलीय्. चला आता घरी!'.

## ११. रीडसाहेबांची गाडी

रे. एच. सी. रीड म्हणून एक विद्वान, सज्जन आणि धार्मिक वृत्तीचे मिशनरी होऊन गेले. त्यांच्या सद्वृत्तीची त्यांना पावतीही मिळाली. नाशिक डायोसिसचे ते बिशप झाले. रेव्हरँड रीड चे 'द राइट रेव्हरँड बिशप रीड' झाले. त्यांच्या विषयी नितान्त आदर बाळगणारी थोडीफार मंडळी अजून हयात आहेत. त्यांतला मीही एक.

मला स्वत:ला रीडसाहेबांच्या व्यक्तित्वाचा एक निराळाच पैलु गोचर झाला होता. (कदाचित् आणखीही कुणाला दिसला असेल पण कुणी बोलून दाखविला नाही). त्यांची शरीरयष्टी, हावभाव, बोलणं चालणं, आणि चालतांना विशिष्ट पद्धतीचं डुलणं, सारं काही प्रसिद्ध जाड्यारड्यांच्या जोडीतल्या रड्या लॉरेल सारखं. अगदी एकाला लपवावा दुसऱ्याला काढावा. त्या मूर्तीला साजेलशी त्यांची मोटारगाडी पण होती. तशी गाडी मला नुकतीच टीव्हीवर दिसली - जुन्या मोटरींच्या प्रदर्शनांत - फोर सिलिंडर फोर्ड मॉडेल १९२३.

आजच्या नजरेनं पाहिलं तर ती car नव्हतीच - एखादी हालती चालती चहाची टपरी. आकार उभट चौकोनी. चाकं बॉडीपासून अलग. जवळजवळ वीतभर दूर. नाक अंगदीच नकटं. आजकाल तो नवीन मास्क निघालाय तसल्या रंगरूपाचं. दिवे पेटायचे ते गाडी चालू असतांना. बंद पडली की दिवेही गुड्डुप.

रीडसाहेबांची बाबांशी दोस्ती. दोघांत काय साधर्म्य होतं अल्ला जाने. पण दोघांच्या खूप गप्पा चालायच्या. एकदा त्या गाडीचा विषय निघाला. साहेब उवाच - 'ह्या गाडीचे कोणी शंभर रूपये पण देणार नाही.'

'मग मी देतो शंभर रूपये' बाबा म्हणाले. आणखी थोडी बातचीत झाली आणि बाबा गाडी घेऊनच घरी आले.

आमच्याकडे हिचे खूपच लाड झाले. बिचारी इतकी साधी होती की तिला ड्रायव्हरच्या डाव्या हाताशी असते ती गीयर बदलायची खुंटी सुद्धा नव्हती, पायानं दाबायच्या कळा तीनच. एक फूटब्रेक, दुसरा गीयर आणि तिसरा रिव्हर्स. चढ आला की गीयरची कळ दाबायची. एरवी सरळ गाडी चालू. काम सोप्पं - आम्ही तसे लहानच १२-१४ वर्षांचे. पण झकास ड्रायव्हिंग शिकलो. आमची मावशी पण शिकली. एकदा काकांना खिजवायला म्हणून मी विचारलं, 'अंकल, तुम्हाला गाडी चालवता येते का?

'रिफ्लेक्स' जवाब मिळाला 'ढकलता येते!'.

ड्राईव्ह कुणी का करीना हँडील मारायचं काम माझं ठरलेलं. कधी कधी संध्याकाळचे आम्ही लांब फिरायला जात असूं. अगदी इगतपुरीला भेट देऊन येत असूं. गाडी छान चालायची मात्र परततांना घरापासून बरोबर दीड मैलावर थांबायची. दिवेहि बंद. मग मी आणि दामूनं हाती कंदील घेऊन चालत त्रिंबक नाक्यापर्यंत यायचं. पेट्रोल ग्यालनभर घेऊन अंधारात धूळ तुडवीत परतायचं. चालतांना कंदीलवाल्यानं रस्त्याच्या एका कडेनं तर पेट्रोलवाल्यानं दुसऱ्या कडेनं अशी बाबांची ताकीद होती.

कधी कधी आईला शाळेत सोडायला बाबा गाडी घेऊन निघायचे. आईला हे मुळीच आवडत नसे. कारण शाळेच्या दाराशी गाडी बघायला बघे जमायचे.

काही असो. गाडीनं जवळजवळ दोन वर्ष आमची इमाने इतबारे सेवा केली. मग तिचा शेरच संपला. पुढून येणाऱ्या टांग्याला समोरसमोर टक्कर देऊन गाडी खाली बसली ती बसलीच. टांग्याला काही झालं नाही, घोड्याला काही झालं नाही. गाडी मात्र पुढली दोन्ही चाकं जमीनीवर टेकून खाली बसली. पुन: उठली नाही.

बरेच उपाय झाले. शेवटी बाबांनी ती गाडी पुणे अनाथ विद्यार्थी गृहाला भेट दिली. अट एकच. गाडी मुलांना चालवायला द्यायची नाही. तिचे पार्ट मोकळे करून शिकवायला तेवढे वापरायचे.

आज तेही पार्ट तिथं कुठं दिसत नाहीयेत. गेली बिचारी.

## १२. 'तुमच्या आजोबांनी आम्हाला संस्कृत शिकवलंय!'

आम्ही तेव्हा इंग्रजी दुसरीतिसरीत असू. आमचा एक शाळूसोबती जसा नाचतच शाळेला आला. सगळ्यांना सांगत सुटला. 'आम्ही आज डॉक्टर मुंजे पाहिले-आमच्या शेजारीच आलेत ते!'.

डॉक्टर मुंजे म्हणजे कोण? ते काय करतात? वगैरे काहीच मला माहीत नव्हतं. वर्तमानपत्रं वाचायची सवय किंवा आवडही नव्हती. पण डॉ. मुंज्यांचे फोटो आणि व्यंगचित्रंही पुष्कळ पाहिलेली होती. ठरलं. डॉ. मुंजे पहायचे अन् आपल्या बुकामधे त्यांचा संदेशही घ्यायचा. ते दिवस वडील माणसांना भिण्याचे होते. डॉक्टरांची भीती तर वाटत होतीच शिवाय ते उतरले होते त्या भाऊसाहेब पाटणकरांनाही आम्ही भीत होतो. अखेर मोठा जीव करून त्यांच्याकडे गेलो. बरोबरचे दोघे सोबती दारातच थांबले. मोठ्या थोरल्या खुर्चीवर डॉ. मुंजे विराजमान झालेले. भोवती अनेक मोठमोठी माणसं. मी भीत भीत 'अटोग्राफ-बुक' पुढे केलं. ते घेऊन त्यांनी चाळून पाहिलं. हातात पेनही उचललं आणि एकदम सवाल केला - 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मेंबर आहांत तुम्ही?'.

'न् न् नाही' - माझं त्रोटक उत्तर.

'मग सही नाही!'. मुकाट्यानं परत फिरलो आणि मित्रमंडळींचा हास्यविषय झालो.

वर्षभरानं पुन: योग आला. आतां त्यांचं भोसला मिलटरी स्कूल आकारात येत होतं. बाबांशी त्यांची पहचान - किंवा मैत्रीही म्हणता येईल - झालेली होती. आणि ते आमच्या घरी आलेले होते. या वेळी त्यांनी माझं बुक हातात घेतलं. बारकाईनं पाहिलं. खुशीनं त्यात सही केली आणि माझ्या पाठीवर दणकून थाप देत म्हटलं 'तुमच्या आजोबांनी आम्हाला संस्कृत शिकवलंय् !'

## १३. अशोकनं रडवलं !

शांतिसदनातला नाताळ म्हणजे आमची एक मोठीच पर्वणी असायची. सुटी दहा दिवसांची. पण तेवढ्यात आमचे ७-८ तरी कार्यक्रम व्हायचे. एक खास प्रघात म्हणजे आईबाबांचे मिशनरी मित्र जेवायला यायचे. पंचवीस तीस पानं बसायची. थाट पाट-ताट-वाट्यांचा.पाहुणे सारे गौरकाय. त्यांत एखादे मद्रदेशीय थॉमस मॅथ्यू किंवा मॅथ्यू थॉमस.

जेवण म्हणजे नुसतंच 'उदरभरण नोहे' नसायचं. जोडीला काहीतरी रंजक आयटेम. एका वर्षी आम्ही 'जडावाची देवी' ही नाटिका बसवली होती. आपले बाळासाहेब काळे तालीम-मास्तर. नाटिकेत पात्रं चारच. ही आम्ही चौघा भावंडांनी रंगवली. आणखी पाचवा एक फौजदार. ती भूमिका आली दामूकडे. दामू हा बाबांनी सांभाळलेला एक खेडवळ विद्यार्थी. याचे हेल जरासे अडाणी. तो 'पकडलं' ऐवजी 'पकाल्डं' म्हणायचा. त्याची तीच भाषा कायम ठेवली होती.

जडावाची देवी हे इंग्रजी Bishop's Candlestick चं मराठी भाषांतर. कथानक मोघम सगळ्यांना ठाऊक. शिवाय त्याचं इंग्रजी gist बाबांनी सुरवातीला प्रेक्षकांना वाटलं होतं. नाटकात सुरवातीला दांडगाई करणारा आणि अखेर पश्चात्तापानं रडणारा चोर तो मी झालो होतो. त्याच्याबरोबर मलाही रडू यायचं.

कुठंही आणि केव्हाही आमच्या तालमी चालायच्या. त्या आता इतक्या अंगवळणी पडून गेल्या होत्या की त्यांचा भावनिक परिणाम तो आम्हाला जाणवायचाही नाही. यंत्रासारखं सुरळीत काम चालायचं.

एकदा तालीम सुरू होतेय् तेवढ्यात आमचे सोपानकाका (कवि सोपानदेव चौधरी) आले. चारपाच प्रेक्षकांच्या दाटीत तेही बसले. तालीम बिनबोभाट चालली होती. तो मधेच कुणाचा हुंदका ऐकू आला. आम्ही सगळे एकदम् चमकलो. काय झालं, कुठं झालं, कुणाला समजेना.

एकीकडे रडत, एकीकडे हासत, डोळे पुशीत सोपानकाका म्हणाले - 'अशोकनं रडवलं!'.

## १४. बंडल

आमच्या लहानपणी आजचा सर्वमान्य 'बंडल' शब्द कुणाच्या ऐकिवातही नव्हत मूळचा तो साधासुधा निरूपद्रवी इंग्लिश शब्द. पण आज तो जरा मिस्किल अर्थच्छ पेहरून मराठीमधे पक्का पाय रोवून बसला आहे. तो आला कसा तुम्हाला माहीत नसेल मला ठाऊक आहे.

इसवी सन १९३५-३६ मधे नाशिकचे प्रसिद्ध विडीवाले भिकुसा यमासा क्षत्रि अकस्मात् जाहिरातीचा अभिनव विक्रम करून गेले. दोनदोन विड्यांची लघु-पाकि वाटीत प्रभातफेऱ्या निघू लागल्या - 'भिकुसा छाआआप । बिडि ओढा मधुर ह साफ॥' अशी गाणी घुमायला लागली. 'चोवीस नंबरचं बंडल' हा तर परवलीचा शब्द होऊन बसला.

पांडू साळी, नरहरी सरोदे, ध्रुव टिळक, माधव कोल्हटकर (आजमितीस चौघे कैलासवासी) आणखी दोघे तिघे अशी नाशिक हायस्कुलातल्या पहिलीच्या पठ्ठ्यांची टोळी होती. पोरं वात्रट! कुणी काही उत्साहानं सांगायला लागला की यांनी टर उडवावी - 'क्का ? किती नंबरचं बंडल?'

आणि इथून हा 'बंडल' जो निघाला तो हां हां म्हणता सारा महाराष्ट्र व्यापून उरला. उराल पर्वत आणि कॅस्पियन समुद्र वलांडून इंग्लंडात जाऊन पोचला आणि आता तर भारताच्या 'ब्रेनड्रेन' बरोबर अॅटलँटिक महासागर लंघून अमेरिकेमधेही जाऊन स्थायिक झालाहे.

आपल्या लहानग्या मित्रांचा हा दिग्विजय पाहून आम्हा बुद्रुक मंडळींना किती धन्यता वाटत असेल कल्पना करा.

## १५. नेहरूचाचांची स्वाक्षरी

पं. जवाहरलाल पंतप्रधान झालेले नव्हते, नेहरूचाचांचं ते जगजाहीर शिशुप्रेम गाजायला लागलं नव्हतं, तेव्हाची गोष्ट. १९३७ सालची ती नवलाची निवडणूक. प्रचाराचा धडाका सुरू झालेला. नाशिकसारख्या साधारण गावांतूनही राष्ट्रीय पातळीवरच्या पुढाऱ्यांची (तेव्हा 'नेता' नव्हता) पायधूळ झडू लागली. आणि एका धन्यधन्य सायंकाळी पं. नेहरूंचे व्याख्यान जाहीर झालं.

संध्याकाळी पाच-साडेपाच पासूनच य. म. पटांगणावर गर्दी लोटायला लागली. आम्ही तेव्हाची शाळकरी पोरं, आम्हाला राजकारणातलं ओ की ठो कळत नव्हतं. (आज तरी कुठं कळतंय म्हणा!) मोठ्यां हुरूपानं गर्दीत सामील झालो.

पंडितजी आले किती वाजता, बोलले काय काय, सभेत घडलं काय काय, काही याद नाही. नेहमीच्या तडफदार चालीनं आणि झपाट्यानं ते निघाले. एक धिट्टुकला शाळकरी कुमार (म्ह. आजचा भारदस्त अप्पा टिळक) एवढ्या गडबडीत त्यांना जाऊन भिडला. आपलं अटोग्राफ बुक (स्वाक्षरी पुस्तक) पुढे करून वाट अडवून उभा राहिला.

पंडितजींनी त्याच्याकडे धड पाहिलंही नाही. त्याची वही हिसडून हवेत भिर्कावून देऊन ते पुढे चालू लागले.

गर्दी ओसरल्यानंतर किती वेळ तरी बापडा वही शोधीत होता पण नाही मिळाली. वही ती गेलीच. तिच्याबरोबर काय काय गेलं? १९३३ सालच्या कविसंमेलनाला जमलेले अध्यक्ष माधव ज्युलियन, कवी गिरीश, साहित्यपरिषदेचे आधारस्तंभ र.लु.जोशी, गं.दे.खानोलकर, विठ्ठलराव घाटे, डॉ. मुंजे, कित्येकांच्या सह्या, कित्येकांचे संदेश! साहित्यलक्ष्मीची स्वाक्षरी अजूनही सही सही याद आहे.

'माझी सतत एकच ईच्छा आहे कि माझ्या कूंटूबात
सगळ्यांनी जनशेवा व वांगमय शेवा करणरे असावे
- लक्ष्मीबाई टिळक.'

## १६. ख्रिस्ती समाजात इलेक्शन नकोच

मराठी ख्रिस्ती समाज म्हणजे अठरा धान्यांचं कडबोळं - अठरापगड जातीजमातींतून गोळा झालेलं. मात्र आमचे 'बिनीचे पाईक' पहिल्या जातकुळी वलांडून पल्याड गेलेले. 'आम्ही जातीचे ब्राह्मण आमचे सोयरे मुसलमान' ही रूढी आकार घ्यायला लागलेली. मेरीबाई कृष्णराव सरोदे, प्रभाकर सालोमन शेख, जॉन कोंडिबा कवडे असली गंगाजमनी नावं ख्रिस्ती समाजातच आढळायची. ख्रिस्ती समाज एकसंध होत चालला होता एवढं निश्चित्.

सन १९३७. त्या महान् ऐतिहासिक निवडणुकीचे वारे वाहू लागले. ख्रिस्ती लोक राजकारणापासून दूर दूर पळणारे - पण त्यांच्यातही चलनवलन सुरू झालं. नगर, पुणे

जिल्ह्यांतून ख्रिस्ती समाजासाठी एक जागा होती. स्पर्धक पुढे झाले तीन. पहि रामकृष्णपंत मोडक (आजची ओळख म्हणजे शाहु मोडकांचे वडील), दुसरे प्रसि ॲडव्होकेट भास्कर भाऊराव चक्रनारायण आणि तिसरे देवदत्त नारायण टिळक आमचे बाबा.

प्रचाराची धामधूम आणि चिखलफेक सुरू झाली. मतदारांच्या पूर्वजांच्या जा जातिभेद, जातिद्वेष यांना नवी धार चढू लागली. जातिभेदाचं गाडलेलं भूत पु धुमाकूळ घालायला उठलं. भास्करराव तर सभांमधून सरळ आश्वासनं द्यायला लाग - 'मला निवडून द्या. मी तुमची महारकीची वतनं परत मिळवून देतो.'

बाबा खडबडून जागे झाले. त्यांचा निश्चय ठरला - ख्रिस्ती समाजात इलेक्श नकोच! त्यांनी ताबडतोब नाव मागे घेतलं आणि बाकी दोघांना जाहीर आवाहन के 'दोघे तडजोड करा आणि निवड बिनविरोध होऊ द्या.'

अर्थात् असली अवसानघातकी मसलत ऐकतो कोण? हैदोस चालूच राहिल व्हायचं तेच झालं, आणि जे काही झालं त्याची फळं समाज आजही भोगतो आहे.

## १७. एका चांगल्या मुलाला दंड झाला त्याची गोष्ट

शाळेत असतांना मी एक चांगला मुलगा होतो. तेव्हाच केवळ नव्हे तर आ अध्यापनक्षेत्रात वर्षं काढल्यानंतरही माझ्या मनाची हीच साक्ष आहे. मी कध चोरीचहाडी केली नाही, कधी अपशब्द उच्चारले नाहीत, कधी भिंतीवर काही घाणेर लिहून ठेवलं नाही, चोरून विड्या ओढल्या नाहीत, पोरीबाळींची अभद्र थट्टा केल नाही, अगदी उत्तम जरी नाही तरी अभ्यास बऱ्यापैकी केला. पण विद्वान् गुरूजनांच्य मते वाईट मुलगा गणला जात होतो. वाईट म्हणजे इतका वाईट की आमच्या कुश रानड्याच्या पालकांना बारके गानू सर धोक्याचा इशारा द्यायचे - 'तुमचा भाऊ एक वाईट मुलाच्या संगतीला लागलाय् बरं!'

तसा मी खोड्या करीत होतो, वर्गात आडव्यातिडव्या शंका विचारून मास्तरांच्य फिर्क्या घेत होतो, त्यावरून छड्याही खात होतो. पण वाईट मुलगा नव्हतो.

आमच्या वर्गात मधु सुळे आणि वसंत झनकर दोघे अभ्यासात अत्यंत हुशार सरकारी स्कॉलर्शिपचे मानकरी. एकदा १५ मिनिटांच्या सुटीत आम्ही तिघेच वर्गा होतो. त्या काळी वर्गावर्गातून भिंतीवर आंग्लभूपालकांच्या तसबिरी झळक असायच्या. आमच्या वर्गात होती राणी एलिझाबेद (१ ली). मधु सुळेला अचानक उ

आली 'चला रे आपण एलिझाबेदला मिशा काढू.' पहिली कलाकुसर सुळेनं केली. दुसरा हात फिरवला झनकरनं आणि फायनल टच मी देत होतो तो खिडकीमधून भाटे सरांनी बघितलं.

कोर्ट-मार्शल झाली. मला आठ आणे दंड झाला. वर्गावर्गातून नोटिस फिरली. काही गुरूजनांना अत्यानंद झाला. माझ्या उदाहरणावरून काहीजणांनी बोधही केला. ड्रिल-सर ए.डी.शेख मात्र हळहळले, म्हणाले 'एका चांगल्या मुलाला दंड झाला आहे !'

साऱ्या ह्या मामल्यात सह-अपराध्यांची नावं मी कुठंच सांगितली नाहीत. आताच पहिल्यांदा सांगतोहे. याबद्दल माझी मनापासून पाठ थोपटली एकट्या दत्तू प्रधानानं (रिटा. इन्कमटॅक्स कमिशनर मि.डी.जी. प्रधान यांनी) - 'नावं सांगितली नाहीस फार चांगलं केलंस. दोघही स्कॉलर. स्कॉलर्शिपाच गेल्या असत्या दोघांच्या'. उपकृत सन्मित्रांनी मात्र उभ्या जन्मात ह्या उपकाराची ओळख दिली नाही.

## १८. भय्या-शिष्टाई

१९३८ जून मधे पुण्याच्या वाडिया कॉलेजने 'अप्लाईड इलेक्ट्रिसिटी' चा कोर्स सुरू केला. पहिल्या बॅचमधले सर्वात मद्दड आणि रद्दड विद्यार्थी म्हणजे अशोक देवदत्त टिळक आणि प्रभाकर रामचंद्र एकबोटे उर्फ भय्या. तसे आम्ही जातीचे मट्ठ नव्हतो. पाठ्य विषयात आम्हाला गोडी किंवा गती अजीबात नव्हती इतकंच. समानशीलतेमुळे आमची गट्टी जमली ती एकदम पर्मनंट.

एका सकाळी बातमी आली. रामभाऊ टिळक - लोकमान्यांचे चिरंजीव - यांनी आमरण उपोषण सुरू केलंय्. त्यातलं कारण किंवा राजकारण आम्हाला काही समजलं नाही. समजायचं आमचं वयही नव्हतं. पण आम्ही हादरलो खरे.

आता भय्या एकबोटेला कॉलेजचा पुरताच विसर पडला. त्यानं सरळ जाऊन रामभाऊंच्या दाराशीच ठिय्या ठोकला. ठिय्या म्हणजे दोन्ही - बैठक तशी पथारी सुद्धा. चोवीस तास मुक्काम तिथंच. आंघोळीला, जेवायला जाऊन येई तेवढाच. पण तेवढ्यासाठी एक रिलीव्हरही भेटला होता. रामभाऊंची मनोभावे सेवाचाकरी केली, पडतील ती कामं केली सारी.

पंधराएक दिवसांनी साऱ्या पत्रांतून शुभवृत्त झळकलं - श्री. भय्यासाहेब एकबोटे यांनी विनंती केल्यावरून नाम. बाळासाहेब खेर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी

या प्रकरणी लक्ष घालण्यास मान्यता दिली असून त्यांच्या आग्रहानुसार रामभाऊ टिळकांनी उपोषण मागे घेतले आहे.

बातमी वाचली आणि धावत भंय्याकडे गेलो. गडी आनंदानं अक्षरशः उड्या मारीत होता - नाव छापून आलं म्हणून. मग त्यानं 'मला म्हणून' सांगितलं, 'रामभाऊ टिळक खरोखर उपास करताहेत का, हे मला बघायचं होतं, म्हणून मी त्यांच्यावर चोवीस तासांचा पहारा ठेवला. अन् जेव्हा खात्री झाली तेव्हा मी ताबडतोब मोठ्या मोठ्या लोकांना पत्रं धाडायला सुरवात केली. किती तरी जणांना लिहिलं, पण ऐकलं ह्या दोघांनीच'.

काही असो शेवट गोड झाला. मात्र नामदार खेर आणि डॉ. बाबासाहेब असल्या दिग्गजांना सरळ जाऊन भिडणारे हे भय्यासाहेब खरे केवढे आहेत हे आम्हा दोघांनाच ठाऊक !

## १९. एका जन्मजात कलावंताची करूण कहाणी

तेव्हा मी अगदीच बाळ नव्हतो. वाडिया कॉलेजमधे चांगला सेकंडीयरला होतो. अशोकच होतो. 'अप्पा'ची भारदस्त झूल चढायला किमान पस्तीस वर्षांचा अवकाश होता.

हॉस्टेलमधे पहिल्या वर्षी जमणारी गट्टी चिरस्थायी होत असते. अशीच गट्टी माझी आणि सदू परूळेकरची (किंवा प्रो. एस.जी.परूळेकरांची). पहिलं वर्ष संपताच सदूनं हॉस्टेल सोडून बादशाही लॉजमधे स्वतंत्र खोली घेतली. लॉजमधल्या विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र खोल्या टिपिकल असायच्या. भिंती ताशीव बिनपॉलिश फळ्यांच्या आणि मध्यभागी पहुडलं की चारी भिंतींना हातपाय पोचावेत एवढं चटई-क्षेत्र.

एका शनिवारी दुपारी सहज सदूच्या खोलीवर गेलो. एन्ट्री घेताच मला आणखी लहानपणची आठवण झाली. बालबोधमेवा मासिकात मिस थिया आल्वा नावाच्या मुलीचा फोटो आला होता. खुर्चीवर बसून दोन हातात दोन आणि दोन पायात दोन खडू धरून ती एकाच वेळी चार वेगवेगळी चित्रं रेखाटत होती. मी जन्मजात जादुगार, अथ्लेट, कलावंत वगैरे बराच काही. मला हे एक आव्हानच होतं आणि मी ते झेललं आणि ते पेललं सुद्धा. मात्र चित्रं काढण्याऐवजी मी ए बी सी डी वर भागवीत असे.

मी लगेच जमिनीवर सतरंजी टाकली. खेळाडूचा पोषाख चढवला, म्हणजे सदरा-पैजामा फेकून नेसत्या चड्डीनिशी तयार झालो, पायांना खडू बांधण्याची खटपट सुरू

केली. सदू 'नको नको आता आमचे मेहुणे यायचे आहेत' असं काही सांगत होता. त्याच्याकडे साफ दुर्लक्ष करून मी प्रोग्रॅम सुरू केला. तेवढ्यात पाहुणे आले. हे सदूचे 'मेहुणे इतकं मी नुकतंच ऐकलं होतं. पण ते कोण अन् केवढे आहेत मला काय ठाऊक? रस्त्याने चालतांना मधे १० हातांची मर्यादा सोडून, पट्टेवाल्यानं दप्तर घेऊन पुढे चालावं इतके ते बडे होते (तेव्हा व्हीआयपी शब्द नव्हता). शरम के मारे मैं तो आधा हो गया ।

मला हालणं उठणं तर शक्यच नव्हतं. अखेर सारी दुनिया झाकून टाकणारे दोन निसर्गदत्त पडदे - ज्यांना सामान्य लोक पापण्या म्हणतात - ते गच्च बंद करून मी गपगार पडून राहिलो. कुजबुजत्या स्वरातला डायलॉग ऐकत राहिलो.

'अरे हा आहे कोण?'

'हा माझा मित्र अशोक टिळक'

'अन् हा असा काय पडलाय?'

'डोक्यानं जरा चक्रम आहे.'

'कॉलेजला तरी जातो का नीट?'

'हो तर! अभ्यासात हुशार आहे हा!'

दोन्ही लबाड्या. मी डोक्यानं चक्रमही नव्हतो आणि अभ्यासात हुशारही नव्हतो. पण काय करतो? मुकाट्यानं ऐकत राहिलो. थोड्या वेळानं पाहुणे गेले. सदू त्यांना वाटे लावून आला. मी त्याच्यावर चांगलाच उखडलो -

'सद्या, गाढवा, हे असं काय सांगितलंस?'

'मग दुसरं काय सांगणार? तूच सांग.'

## २०. गाडी चुकवली

भय्यांची माझी जानी दोस्ती. कारण वर्गामधे पक्के ढ आम्ही दोघेच. मी हॉस्टेलात रहायचा. भय्या शनवारात कुठं तरी एका खोलीचा चतुर्थांश पार्टनर. कॉलेजला तो कधीतरी आवसेपुनवेला दिसायचा. त्यामुळं आमची भेट रोजची नव्हती. पण दोस्ती पक्की.

डिसेंबर महिना तो. दिवस लहान. सात नाही वाजले तो अंधार आणि थंडी यांचं राज्य सुरू व्हायचं. अशा कातरवेळी भय्या धावत धपापत आला - 'टिळक, आत्ताच्या आत्ता चल माझ्याबरोबर!'

चुलत्याच्या एका स्नेह्यानं पाय पसरायला ओसरी दिली होती. फावल्या वेळात वैकुंठनाथासवे हरिभाऊच्या ओसरीवर लोळायचं नाहीतर रानोमाळ कुठंतरी भटकायचं अशी आमची सुटी मजेत चालली होती.

ता. १ एप्रिलच्या शुभदिनी सकाळी शिरस्त्याप्रमाणं मी आणि वैकुंठनाथ फिरायला गेलो. साडेसातच्या बेताला परत येतो तो अख्खी चाळ माझ्याकडे विलक्षण आदरयुक्त नजरेनं पहात असल्याचा जीवघेणा संशय आला. प्रथम पाध्ये आडवे आले. 'अहो, अहो अशोकराव, आताच तुमच्याकडे शंकरराव येऊन गेले!'

मी जरा चमकलो. पण वैकुंठनाथ शहाणा. त्यानं मला खुणावलं, 'अरे एप्रिल-फूल हे. दुसरं काय?'

खोली उघडतो तो पंडित हाक मारीत आले, 'अहो आताच शंकरराव तुमच्याकडे आले होते हो!'

'अस्सं का? काय म्हणत होते?'

'तुम्हाला आज संध्याकाळी जेवायला बोलावलय त्यांनी.'

आम्ही हसू लागलो तसे पंडित तापू लागले. त्यांची स्पेसिफिक हीट जरा बेताचीच आहे. मी पुढं म्हटलं 'त्यांना असं सांगा -'

'I am not your servant!' पंडित आता इंग्रजी बोलण्याइतके तापले होते. पटकन् घूमजाव करून ते चालते झाले.

साठेआठला कारखान्यात जायचं. वाटेत किमानपक्षी दोन डझन व्यक्तींनी मला शंकरराव येऊन गेल्याचं ऐकवलं. कारखान्यातल्या कामगारांच्या टीमवर्कची आणि विनोदबुद्धीची मी मनोमन तारीफ करू लागलो. कारण शंकरराव म्हणज़े वाडीमधली बड्यात बडी आसामी होती.

सायंकाळपर्यंत निरोपावर निरोप येत होते. आता वसंतराव, हरिभाऊ, वैकुंठनाथ सारे माझ्या साह्याला आले. त्यांनी माझ्या वतीनं उलटसुलट पलटनिरोप द्यायला सुरवात केली. हे निरोप पोचताहेत किंवा नाही याची कोणालाच फिकीर नव्हती. संध्याकाळी खाणावळीत गेलो. तिथंही पुन्हा शंकररावांच्या निमंत्रणाची शुभवार्ता बहुमुखांनी येऊन पोचली. हरिभाऊनं साऱ्यांना मिळून एक उत्तर ठोकून दिलं. 'रात्री साडेनऊ वाजता टिळक त्यांच्याकडे जाणार आहे.' पानावर बसतो तो शंकररावांचा माळी दारात उभा. 'शंकरअन्ना वाट पात्यात. जावा की लौकर' - त्याला परस्पर उत्तर मिळालं 'त्यांना म्हणावं थांबा, अत्ता येताहेत'.

भोजनोत्तर हरिभाऊंच्या ओटीवरची दैनंदिन लोळी, नैमित्तिक पानचघळी वगैरे महत्त्वाचे कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पडल्यावर रात्री साडेनवाच्या सुमारास मी रमतगमत घराकडे निघालो. शंकररावांच्या बंगल्यावरूनचं माझी वाट होती.

शंकरराव उंचेपुरे, रुबाबदार नि मोठे शिस्तप्रिय गृहस्थ. त्यांचं चालणं आणि बोलणंही तसंच ताठ. ते रागारागानं आंगणात येरझाऱ्या करीत होते. मला पहाताच कडाडले, 'काय रे, किती वाट पहायची तुझी?'

'हा काय, आलो ना. जरी उशीर झाला' मी निरागसपणे उत्तरलो.

'बरं. चला आता लौकर बसा जेवायला!'

त्या काळी आंगणात टेबलं मांडून, त्यावर ताटंवाट्या ठेवून जेवणारी माणसं दुर्मिळ असत. टेबलावर तांब्याभांड्याऐवजी गार पाण्याची छोटी मडकी ठेवलेली पाहून माझेही डोळे निवले. त्या योजकतेचं कौतुक करण्यात मी गढून गेलो. तेवढ्यात खरोखरच्या पुरणपोळ्या घेऊन सौ. आनंदीबाई बाहेर आल्या.

'म्हंजे? खरोखर जेवायचंय की काय?' मी थक्क होत्साता ओरडलो, 'मला वाटलं सारं एप्रिल-फूल चाललाय्!'

झाली आमची गोष्ट. यानंतर पुढे जवळजवळ बारा वर्षांनी आमच्या भेटीचा योग आला. त्या वेळी शंकरराव किर्लोस्करांनी अगत्यानं त्या एप्रिल-फुलाची आठवण काढली. आमचा लोभ होताच तसा.

## २२. वाढदिवस सुखाचा जावो !

आमच्या घरी वाढदिवसाचं प्रस्थ मोठं. इतर सणवार कमी म्हणून कदाचित् आईबाबांनी हे स्तोम माजवून ठेवलं असावं. घरात गोडधोड व्हायचं, बक्षिसांची लयलूट व्हायची, 'वाढदिवस सुखाचा जावो' म्हणून 'बर्थडे-बॉय'ला सगळ्यांनी बधाई द्यायची. माझा वाढदिवस विशेष थाटाचा. कारण उन्हाळ्याची सुटी असायची, आणि बक्षिसाचा झिझिया भरायला सगळीच उत्सुक. माझी चमाण व्हायची.

घराच्या बाहेर झालेला माझा पहिला वाढदिवस तो अठरावा. २९ मे १९३९. तेव्हा मी किर्लोस्करवाडीच्या कारखान्यामधे अनपेड ॲप्रेंटिस होतो. तिथं माझ्या वाढदिवसाचं कोणाला काय? मित्रांना पार्टी देऊन अभिनंदनं वसूल करायचं तंत्र मला अवगत नव्हतं. तेव्हा हा दिवस आला तसा जाणार हे ठरलेलं होतं. पण आजपर्यंतच्या माझ्या ७९ वाढदिवसांमधे हाच माझ्या खास स्मरणात राहिला आहे.

खंडो रामचंद्र कु॥ नावाचे भले गृहस्थ तेव्हा किर्लोस्करवाडीचे पोस्टमास्तर होते. त्यांची माझी तोंडओळख झालेली होती. पण स्नेह असा नव्हता. कारण एक तर त्यांच्या आमच्या वयातलं ३५ वर्षांचं अंतर, दुसरं म्हणजे ते दिसायला गंभीर आणि काहीसे उग्र वाटत, आणि तिसरं म्हणजे ते पानतंबाखूचे मोठे भोक्ते होते. मी आपला जरासा दबून त्यांच्यापासून दूरदूरच वावरत असे.

त्या दिवशी सकाळीच पोस्टमननं निरोप आणला 'आज दुपारी मास्तरांनी बलावलंय्'. दुपारच्या सुटीत मी त्यांच्याकडे गेलो.आमरसाचा बेत होता. मास्तर जवळ बसून मला आग्रह करीत होते. 'थोडा आमरस-भात ओरपा'.

जेवण झाल्यावर ते मला म्हणाले, 'आज तुमचा वाढदिवस. वडिलांकडून तारेनं आशीर्वाद आले आहेत. हे घ्या. वाढदिवसाच्या दिवशी मुलगा खाणावळीत जेवतो, हे काही आपल्याला बरं वाटलं नाही. म्हणून आज तुम्हाला बोलावून घेतलं.'

## २३. सावल्या

ही गोष्ट १९३९ सालची. किर्लोस्कर मासिकानं विद्यार्थ्यांसाठी निबंधाची चढाओढ जाहीर केली. (त्या काळी स्पर्धा नसत.) विषय 'माझा १९५० चा हिंदुस्थान'. मी नुकताच किर्लोस्करवाडीला तीन महिने मुक्काम करून आलेला. त्यामुळे किर्लोस्कर मंडळींची गंमत करण्याचा हा नामी मोका मिळाला. माझा निबंध कुठं मोजला जाईलशी अपेक्षा नव्हतीच. चढाओढीचा निकाल जाहीर झाला. माझ्या लेखाची बोळवण - नाव न घेता - अशी झाली. 'अगदी टाकावू असा निबंध एखादाच'. निकाल लागल्यावर बाबांच्या मनात कल्पना आली की या निबंधाचं एक मजेदार पुस्तक काढावं. काढलं. त्याचं नाव 'सावल्या'. त्यात दोन भाग केले होते. पहिला 'माझा १९५० चा हिंदुस्थान' आणि दुसऱ्यात माझ्या काही फुटकळ गोष्टी कविता वगैरे. दोन भागांना दोन बुजुर्गांच्या प्रस्तावना. चिं.वि.जोशी आणि शामराव ओक. पुस्तकाची दखल अपेक्षेपेक्षा पुष्कळ अधिक पत्रांनी व लेखकांनी घेतली. मी नुसता हुरळून गेलो. अंदरकी बात सावकाशीनं उमगली.

'पुस्तुकलं' शंकरराव किर्लोस्करांना अर्पण केलं होतं. अर्पणपत्रिकेतल्या व्यंगचित्राचंही खूप कौतुक झालं. मला वाटलं, शंकरराव खूप चिडतील, थयथयाट करतील. पण तसं काही झालं नाही. मामला त्यांनी अगदी इतमामानं हाताळला. त्यांनी मला लिहिलं -

'लेखकाला लागणारे कित्येक गुण तुझ्या अंगी आहेत. तथापि त्या गुणांच्या जोडीला आणखी एक महत्त्वाचा गुण पाहिजे. तो गुण म्हणजे ध्येयवाद. ज्या जगात आपण राहातो त्या जगाची सुधारणा व प्रगति होण्यासाठी थोडा तरी हातभार आपला लागला पाहिजे अशी तळमळ लेखकाला हवी. लेखणी हे एक हत्यार आहे व आपला देश गुलामगिरीत खितपत पडला आहे या दोन गोष्टी केव्हाही विसरता कामा नये.'

काही असू द्या. 'सावल्या' मधे मी भरपूर टिंगल-टवाळी केली होती आणि तिची पावती पाचपंचवीस वर्षांनी अकल्पितपणे मिळाली. 'ख्रिस्ती साहित्यिकांमधे विनोदाची सुरूवात अशोक टिळकांनी केली' असा रिमार्क एका भल्या समीक्षकानं - आपल्या अनिल दहिवाडकरांनी नोंदून ठेवला.

## २४. अध्यक्षांची निवडणूक

मराठी साहित्यसंमेलनासाठी अध्यक्षांची निवडणूक ही प्रथा आधुनिक आहे. पूर्वी कार्यकारी मंडळी आपसात चर्चा करून कुणातरी थोर साहित्यिकाला अध्यक्षपदाचा मान द्यायची आणि संमेलन टुकीनं साजरं व्हायचं. आध्यक्षीय निवडणुकीची म्युनिसिपालटी झाली ती प्रथम अहमदाबादच्या मराठी साहित्यसंमेलनात आमच्या घाटेकाकांच्या अध्यक्षपदाच्या वेळी.

रिंगणात उमेदवार दोघेच होते. विठ्ठल दत्तात्रय घाटे आणि चिंतामण विनायक जोशी. घाट्यांचा प्रचार जोरात चालला होता. आणि इकडे चिंवि तर असले सोज्वळ की 'मला मत द्या' असा शब्दहि त्यांच्या तोंडून निघायचा नाही.

या धामधुमीत घाटेकाकांचं बाबांना पत्र आलं 'घाट्यांना मतं द्या, अशा आग्रहाचं पत्रक काही मित्रांच्या सह्यांनिशी काढलेलं आहे. तुमची संमती गृहीत धरून त्यात तुमचीही सही घातली आहे. तुमची हरकत नसावी.'

हा प्रकार बाबांना फारसा आवडला नाही. कारण घाटे त्यांचे मित्र असले तरी अध्यक्षपद चिंविनाच मिळावं अशी त्यांची इच्छा होती. आपल्या सन्मित्राला त्यांनी उत्तर धाडलं - तुमचं पत्रक प्रसिद्ध झालंच आहे. तेव्हा मी तुम्हाला तोंडघशी पाडत नाही. पण माझं स्वतःचं मत मात्र चिंविना मिळणार आहे.

यावर घाटेकाका काहीच बोलले नाहीत. रांगोबा मात्र धरून बसले.

## २५. कॉलेज-जीवनातल्या दोन प्रेमकहाण्या

हां हां! जरा सबुरीनं घ्या. भलभलते तर्क-कुतर्क करू नका. कारण इथं ते 'कॉलेज-जीवन' तेवढं माझं, आणि दोन्ही प्रेमकहाण्या लोकांच्या. पण मोहबत करनेवाले खुदा के प्यारे होते हैं । त्यांना मदद-मसलत देण्यासारखं पुण्य दुसरं नाही. अन् त्या पुण्यायीचं गोमटं फळ अगदी 'इस हाथ दे उस हाथ ले' करून मिळत असतं. दोन्ही कहाण्यांत माझा भाग एवढाच.

पहिली कहाणी आमच्या मूळशंकर उर्फ बचुभाईची (आडनावात काय आहे?) आणि हिरॉईन ती त्या वर्षीची कॉलेजक्वीन, हॉस्टेलमधली एकुलती 'बाँगला शूंदोरी' मिस ओमिया (पुन्हा एकवार नावांत काय आहे?). बचुभाईची आम्ही नेहमी टिंगल उडवीत असू. पण एक दिवस तो मजनू माझ्याकडे येऊन अक्षरश: 'रोओी पड्यो'. अश्रूंचं सामर्थ्य तुम्ही जाणतांच. मी विरघळलो आणि त्याच्या साह्याला धावून - नव्हे वाहून गेलो.

'दिठी दिठी गाठी भेटी' वलांडून गाडी पत्रापत्रीवर येऊन ठेपली. बचुभाईच्या हाती पहिलं प्रेमपत्र आलं. हालक्या गुलाबी सुगंधी कागदावर गोजीरवाण्या अक्षरांत अगदी चॉकलेट-स्वीट शब्दांत लिहिलेलं....... पण इंग्रजी! आणि बचुभाई पडले 'ब्लेक मोटरमंदी बसून कोलेज ज्यानार, उत्तर कसं लिहिणार? इथंच आमचा हीरो रडला.

मग मी पुढं होऊन प्रीतीच्या राज्यातलं टपालखातं हाती घेतलं. दोन महिन्यात चांगली दीड डझन प्रेमपत्रं - इंग्रजीत लव्ह लेटर्स - लिहून दिली. त्यांच्या प्रेमकहाणीचं पुढं काय झालं माहीत नाही. पण माझ्या स्वयंसेवेचं फळ माझ्या पदरात पडलं. माझं इंग्लिश छान छान सुधारलं. आजसुद्धा एखादे वेळी एखादा बुड्ढा-अड्डा-सदस्य (म्ह. ज्येष्ठ नागरिक) इंग्रजी मसुदा करून घ्यायला माझ्या दारी येतो. त्या यशाचं रहस्य हे आहे.

दुसरं प्रेमी युगल असलं उल्लू नव्हतं. चांगलं शहाणं होतं. पुढे त्यांनी आपला प्रेमविवाह यशस्वी करूनही दाखविला. पण तेव्हा त्याचं 'नवथर प्रीती' आणि 'थरकाप' असलं काही चाललं होतं. रोज पहाटे साडेपाच वाजता नायिकेकडून नायकाकडे गरमगरम कॉफी रवाना व्हायची. थर्मास-बेअरर लिंबा रखवालदार.

त्याला रंगेहाथ अटक करून मी सज्जड दम भरला, 'असले धंदे करतोस काय? थांब काकांना सांगून तुला घरीच बसवतो.'

गडी काकुळतीला आला. गयावया करायला लागला. तेव्हा मी त्याला खडसावून सांगितलं, 'तुझ्या त्या शांताबायला म्हणावं कॉफी एक नाय, दोन कप धाडली पायजेल. पहिला त्या टिळकबाबाला. मग दुसरा तुझ्या खंताला!'

तुम्हाला सांगतो. प्रेमबीम काही झंझट नसलं तरीसुद्धा रोज पहाटे नेमानं घरपोच मिळणाऱ्या गरम गरम कॉफीची लज्जत काही औरच असते.

## २६. टोपी बरोबर ओळखली

प्राचार्य भा. ल. पाटणकर उर्फ मामासाहेब यांचं शिक्षणक्षेत्रातलं कर्तृत्व निदान नाशिकमधे तरी चिरस्मरणीय म्हणावं लागेल. प्रथम इंग्लिशचे प्रोफेसर, मग हंप्राठा चे उपप्राचार्य, मग प्राचार्य आणि सेवानिवृत्तीनंतर महिलांसाठी जिज्ञासा कॉलेजची स्थापना. शिवाय साहित्य-संमेलनासारख्या साहित्यिक हालचालीत सहभाग, राष्ट्रभाषा प्रचार कामी सक्रिय समभाग.. नाही. नाशिकला त्यांचं ऋण विसरता येणारच नाही.

मामांचं एक वैशिष्ट्य - हवं तर वैगुण्य म्हणा - आम्हा छात्रगणांना फार जाणवायचं, भावायचं सुद्धा. ते म्हणजे मामुली कोट्या आणि उथळ विनोद. तसा त्यांच्यात हास्यरसाचा पुरता ठणठणाट होता असं म्हणता येणार नाही. पण त्यांच्या विनोदाला कुणी एखादा गदगदून हसलाहे असं कधी झालं नाही.

एकच सन्माननीय अपवाद म्हणजे आमचा शेख शफी. शफी हा खोडकर, प्रसन्न वृत्तीचा, अभ्यासात जेमतेम, पण वार्षिक परीक्षेत उर्दू-पर्शियन मधे ९५ टक्के मार्क मिळवून फर्स्ट क्लास पटकावणारा अद्भुत विद्यार्थी. कधी हरतऱ्हेचे तरतऱ्हेचे पेहराव करून हंशा उठवण्याची त्याला खोड - प्रमाणाबाहेर नव्हेच.

एकदा मामांचा तास चालला होता. नेहमीप्रमाणे मामुली विनोद चालले होते. पण आज ते शफीला किती आवडले याला प्रमाणच नाही. एकसारखा तो मोठमोठ्यानं हसत होता. हसतां हसतां हातपाय उडवीत होता. तऱ्हातऱ्हा करीत होता. मामांना मात्र वाटत होतं आजचं आपलं लेक्चर छानच रंगलंय्. सारी पोरं शफीच्या चाळ्यांना हसत होती. मामांनी त्याचा अर्थ वेगळा घेतला असावा. पण थोड्या वेळानं त्यांनाही शंका येऊ लागली. वर्ग सुटल्यावर या कार्ट्याला गाठून चांगला फैलावर घ्यावा असा त्यांनी निर्धार केला. दटावून ते त्याला म्हणाले " I have marked your cap".

आजची शफीची टोपी खरोखर mark करण्यासारखी होती. एखाद्या उस्ताद अस्मानखाँ जमीनखाँ गवयाला शोभेलशी.

वर्ग सुटला. मामा दाराबाहेरच त्या व्रात्य कारट्याला धरायला टपून उभे राहिले होते. आता शफी अडचणीत पडला. माझ्याकडे आला. - या संधीला एक सत्य फुशारकी मारून घेतो. अशा अडचणीत आल्या पामराला सल्लामसलत देऊन सोडवायला आम्ही तिघेही भाऊ सदा तत्पर असूं - मी त्याला धीर दिला. 'अरे भितोस काय? तुझी ती टोपी दे मला आणि सरळ बाहेर पड.'

मामांच्या पुढ्यातून शफी निघून गेला. तो सुरक्षित अंतरावर पोचल्यावर मी बाहेर पडलो. तोवर सारी पोरं निघून गेली होती. सर्वांच्या शेवटी मी आणि माझ्या मस्तकी ती प्रसिद्ध शफी-कॅप.

मामांनी टोपी बरोबर ओळखली. पण तिच्यामधलं डोकं बदलल्यावर ते तरी काय करणार?

## २७. बँक ऑफ बेस्ट वुइशेस अन्‌लिमिटेड - हजाराचा चेक

घरचा छापखाना आणि त्यातल्या साऱ्याच कामांची सवय असल्यानं मला बऱ्याच गमतीजमती करता यायच्या. प्रिं. काका कुलकर्णी यांच्या सत्कारसमयी तर मी, मनोहर केळकर आणि रमेश पाठक तिघांनी मिळून रात्रभर हरिजागर करून एक मराठी, एक संस्कृत आणि एक गुजराती अशा तीन कविता रचून, कंपोझिंग प्रिंटिंग सारं उरकून समारंभात सर्वांना वाटल्या होत्या. याचं कौतुकही खूप झालं होतं.

आणखी एक माझा एकट्याचा एंटरप्राइज म्हणजे 'बँक ऑफ बेस्ट वुइशेस अन्‌लिमिटेड'. हिच्या शाखा होत्या 'इकडे तिकडे चोहिकडे' - Here There Everywhere. रात्रभर राबून मी या बँकेचं चेकबुक तयार केलं. हुबेहुब चेक. तीन रंगात छपाई. रूपीज अमुक अमुक या जागी 'ग्रीटिंग्ज वन थाउजंड वन ओन्ली' आकड्यात Gts.1001/-. चेक क्रॉस केलेले. पण क्रॉसमधेही मेख. NOT CROSS. PLEASED. नाताळाच्या आधल्या रात्री पाच पंचवीस जणांकडे चेक रवाना झाले.

मित्रमंडळीमधे खळबळ उडाली. अचानक धनलाभ! प्रो. मु. गो. देशपांडे यांच्याकडून इंग्लिश कवितेत थँक्स् आले. प्रो. गजेंद्रगडकर फिलॉसोफीवाले. त्यांनी

एक हजार एक ग्रीटिंग्जबद्दल फक्त एक हजार आभार दिले. वर मखलाशी 'एक हजार एक' ही मर्यादित रक्कम आहे पण आपल्या संस्कृतमधे सहस्र म्हणजे असंख्य.

आमचा दोस्त बाबूलाल नुंकताच वकिली करू लागलेला आणि नुकताच एका श्रीमान् नातलगाच्या मांडीवर दत्तक गेलेला. चेक आला तो तसाच टेबलावर टाकून वकीलसाहेब कोर्टाला गेले. संध्याकाळी घरी येतात तो माहोल एकदम गरम! पिताजी रागानं नुसते फुरफुरताहेत! 'काय बाबूशेट, भारी शाणे झालेत?'

'काय झालं बापूजी?' बाबू चाचरत बोलू लागला 'माझी काही चुकी झाली का?'

'चूकबूक काय नाय! जाणून बुजून चाललाय सारा! हजार-हजार चे व्यवार करते अन् बूढा बापला पता नाय!'

'नाही हो बापूजी, मी काहीच व्यवहार केला नाही.'

'नाय केला कसा? हज्यार रूपियाचा चेक टेबलावर टाकून गेलावता. मी तो उचलून तिजोरीमंदी ठेवला! हा पहा-'

बाबूनं खूप खटपट केली. गयावया केली. पण म्हातारबुवा एक ऐकेनात. त्यांचं आपलं एकच. 'फार शाणे झाले. बापला च्योरून व्यवार करते.' अखेर बाबूलालनं हात जोडले. चेक त्यांच्यासमोर फाडून टाकला. तेव्हा कुठे बापूजी जरा जरा शांत झाले. मग ते चेकचा अर्थ समजून निवळले का पोराने चोरीचा व्यवहार फाडून टाकल्यानं, त्यांचं त्यांना माहीत!.

## २८. 'आरक्षण' 'सवलती' 'अन्याव'

वगैरे वगैरे शब्द आजकाल काही नवीनच ऊर्जानं कानावर आदळू लागलेत. त्यावरून जुनी आठवण झाली ती सांगतो. पण आधी विनंती की कुणी राग मानू नका.

ते १९४१-४२ साल असावं. नाशिकमधे साहित्यसंमेलन गाजू लागलं होतं. अध्यक्ष आचार्य अत्रे. अर्थात् छोट्यामोठ्या सगळ्याच साहित्यप्रेमिकांना मोठं औत्सुक्य!

सोहळा दोनतीन दिवसांवर आला. सदासंतप्त युवकांचे तांडे गावोगाव असतातच. त्यांतला एक आमच्या नानासाहेबांना भेटायला आला. गुरगुरतच आला. नानासाहेब तडफदार तरूण वकील. ते आम्हा युवकांच्या पाठीशी उभे राहणारच! सगळ्यांना हा भरवसा.

'बघा नानासाहेब, आम्हा आस्प्रूश्य बंधूंवर अन्याव होऊन ऱ्हायलाय्' म्होरक्यानं सुरू केलं. (त्या काळी दलित, मागासवर्गीय इ. शब्द चलनात नव्हते). 'आम्हाला साहित्यसंमेलात घेती नांही. आम्ही त्यांच्या भोजणसमितीकडे जाऊन आलो. म्हणालो - आम्ही शयंसेवक सैपाकाचं काम करायला तयाराहो. तर त्यांनी आम्हाला श्या देऊन पिटाळून लावलं. सगळे बामन भरलेत तिथं! आता आम्ही आंदुलन करनार!'

'हे बघा. एकदम एवढ्यावर यायचं काही कारण नाही. अध्यक्ष आचार्य अत्रे आलेले आहेत. तुम्ही सरळ जाऊन त्यांनाच भेटा. ते नक्की काहीतरी मार्ग काढतील'. नानांनी सबुरीचा सल्ला दिला. 'कार्यकर्थ्यांना' तो पटला. त्यांनी जाऊन अत्रेसाहेबांची भेट घेतली.

'बघा नानासाहेब, आपली जीत झाली! अत्रेसाहेबांनी आपलीच बाजू घेतली. म्हणाले, तुमच्यातला एक जण जेवायच्या वेळेला माझ्याकडे येऊ द्या. मी हात धरून त्याला माझ्याशेजारी बसवीन. मग तर तक्रार नाही ना!'.

नानांनाही आनंद झाला. पण त्यातही त्यांनी एक सावधगिरीचा सल्ला दिलाच - 'झालं ते उत्तम झालं! मात्र तुमच्यातला जो कोणी जेवायला जाणार असेल त्याचं प्रतिनिधीचं तिकीट काढून ठेवा. नाहीतर तेवढ्यावरून कोणी काही हरकत घ्यायचा!'

'कार्यकर्थे' मोठ्या समाधानानं घरी गेलें..... ते दुसऱ्या दिवशी सकाळी भांडत भांडतच पुन्हा आले - 'साहेब. संमेलवाले आमाला तिकीट देती नाही.'

'असं होणार नाही! त्यांना असं करताच येणार नाही' नानासाहेब म्हणाले, 'मी स्वत: जाऊन चौकशी करतो. आधी तुमचं काय काय बोलणं झालं तेवढं सांगा.'

'नाही म्हणजे तिकीट द्यायला ते नाही म्हणले नाहीत. पण आम्ही विचारलं 'साडेतीन रूपयात आस्प्रुश्यांना सवलत किती?' तसे ते म्हणतात - 'सवलत बिवलत काही नाही. तिकीट हवसलं तर साडेतीन रुपये द्या, नायतर चालाया लागा'. आम्ही सरळ तुमच्याकडे आलो. आता काय करावं तुम्ही सांगा.'

इथं आता नानासाहेबच तडकले. काय काय बोलले याद नाही, पण १०-१५ मिनिटं तरी त्यांचं तोंड सुटलं होतं.

जरासं निवल्यावर कार्यकर्थे उठले. हात जोडून म्हणाले - 'नानासाहेब, तुम्ही आमच्या थोरल्या भावासारखे. तुम्ही बोललां ते आमच्या बऱ्यासाठीच बोललां. आम्हाला त्याचा काही राग नाही.'

मग कार्यकर्थे संमेलनाला गेले का, तिकीटं घेऊन गेले का, अध्यक्षांना भेटले का, त्यांच्या पंक्तीला जेवले का, काहीच कधी कानावर आलं नाही.

## २९. अपूर्व मार्गदर्शन

ही कथा १९४३ सालची. रे. जॉन मलेलू यांचा ७० वा वाढदिवस मोठ्या धडाक्यात साजरा झाला. पुढारपण बाबांकडे होतं. या प्रसंगी प्रार्थनासभेत म्हणण्यासाठी गीत रचून द्यायचं कंत्राट माझ्याकडे आलं. प्रार्थनेमधे सर्वामुखी म्हणायचं गीत म्हणजे त्या तोलामोलाचं हवं. रात्री दहा साडेदहा वाजता मी मांडा ठोकून कविता पाडायला बसलो. समोरच्या पलंगावर बाबा पहुडले होते. त्यांनी मला म्हटलं 'कविता पुरी झाल्यावर मला दाखव.'

थोड्या वेळानं जराशी जाग येऊन त्यांनी विचारलं -

'काय रे बुवा, कुठवर आलीहे?'

'चार ओळी झाल्यात'

'ठीकाहे. चालू दे.'

दर अर्ध्या तासानं हीच जाबसाल व्हायची. मात्र जवाब ६ ओळी, १० ओळी अशा चढत्या भाजणीचा मिळायचा.

साडेबाराच्या सुमाराला त्यांनी पुन्हा विचारलं. मी उत्तर दिलं 'झाल्याहेत तशा १४ ओळी. पण पहिल्या चार ओळींच्या मानानं पुढल्या दहा जरा फिक्या वाटतात.'

डोळे न उघडताच कूस बदलता बदलता बाबांनी सल्ला दिला, 'मग पहिल्या चार ओळी उचलून शेवटी ठेवून दे.'

आणि आश्चर्य म्हणजे हा उपाय करताच कविता खरोखर मोठी डौलदार दिसायला लागली.

## ३०. मी निर्व्यसनमुक्त झालो

निश्चयाचे ऐसे बळ । तुका म्हणे तेची फळ ॥ ह्या 'तुका-निर्मित सेतूवरूनी' व्यसनावर मात करून जाणारे आणि तो अनुभव आत्मप्रत्ययानं जगाला सांगणारे महाभाग मला भेटलेले आहेत. मी त्यांना मानतो. ते थोरच आहेत.

अशा थोर विभूतींची गोष्ट निघाली आणि ५०-५५ वर्षांमागली घटना मला आठवली..... आणि इतक्या वर्षात ती न आठवल्याचं माझं मला नवल वाटायला लागलं.

आमचे बाबा 'चुस्त' शाकाहारी आणि 'अट्टल' निर्व्यसनी... आणि दोहींबाबत कट्टर अभिमानी! मी तरी त्यांचाच कुलदीपक. बापसे बेटा सवाई. वयाच्या चोविसाव्या वर्षापर्यंत मला चहाची चव माहीत नव्हती. आणि बाबांना याचं कौतुक वाटायचं. कारण दुसरे दोघे सुपुत्र या बाबतीत कामातून गेलेले. मीही एवढ्यानं फुशारून गेलेला.

आणि एका सुरम्य सायंकाळी विपरीतच काही घडलं. आम्ही थोरलीधाकली सगळीजणं आणि एकदोघे पै-पाहुणे शिळोप्याच्या गप्पा करीत बसलेलो. बोलता बोलता सहज चहाकॉफीचा विषय निघाला. बाबांना काय झालं कुणास ठाऊक? त्यांनी एकदम बंबगोळा टाकला - 'अशोक, तू सुद्धा चहा पितोस!'

मी नाही नाही म्हणू लागलो. काकुळतीला आलो. सगळे हसू लागले. आणि वर बाबांनी ठासून म्हटलं - 'तुला चहा पाजणारांनीच मला सांगितलाहे.'

मी अवाक्षर बोललो नाही. तोंडावरही काही दिसू दिलं नाही. मनाला दारूण यातना झाल्या. तसा मी हळवा वगैरे काही नाही. पण मन व्याकुळ झालं - 'ज्यांच्या प्रेमादराखातर मी इतकी वर्ष हे पथ्य पाळलं त्यांनीच असा आरोप करावा. आणि थट्टेथट्टेत का होईना निखालस खोटं बोलावं?'

दुसऱ्या दिवशी मी निर्धारपूर्वक 'निर्व्यसनमुक्त' झालो. सकाळी दोन कप चहा प्यालो आणि दुपारी एका इसलामी हाटेलीत जाऊन मांसाहाराची दीक्षा घेतली. दोन्ही व्रतं आजतागाईत पाळत आलो आहे.

## ३१. छापखान्यातलं भूत

छापखान्यातलं भूत Printer's Devil म्हणजे काय हे कुणाला सांगायला नको. चिंवि नी 'कंपोझिटरचा सूड' या कथेत त्याला चांगलंच राबवून घेतलेलं आहे. ह्या भुताचा सर्वात मोठा पराक्रम म्हणजे ५० वर्षापूर्वी सकाळ मधे आलेली न्या. नानावटींची निधनवार्ता! ती जर कोणी तुम्ही पाहिली असेल तर अधिक बोलायला नकोच. आणि नसेल पाहिली तर बोलणार तरी काय?

मात्र आता मी जे 'छा-भू' सांगणार आहे ते अजीबात वेगळं. किंबहुना ते भूत म्हणजे दस्तूरखुद्द अप्पा टिळकच.

'नागरिक छापखाना' हा माझा सर्वात प्रिय मित्र. याच्या सहवासात रात्रीचा दिवस आणि दिवसाची रात्र झाली तरी माझ्या ध्यानात येत नसे. एकदा मी असाच टाईप सोडवीत बसलों होतो. बाकीचे जोडीदार वेळच्या वेळी निघून गेले. मी आपला कामात गुंग. अंधार पडू लागला तरी मला भान नव्हतं. आठ साडेआठ वाजले असतील. एकाएकी वीज गेली. टाईप केस चांगली पाठ असल्यानं हातातली तेवढी ओळ संपवणं शक्य होतं. ते मी करीत होतो. तेवढ्यात दारातून हाक आली - 'अहो अप्पाऽऽ'

'कोण ते? या या. सरळ दोन पावलं पुढे या, डावीकडे वळा. तिथंच बाक आहे. बसा. मी आलोच एक मिनिटांत.'

तेवढ्यात पाहुण्यांनी खिशातून पेटी काढून फर्रर्रकन् काडी ओढली. बघतात तो कुणीतरी अंधारात कंपोझिंग करतोय -

'अगऽ बाबोऽ' करीत त्यांनी जी धूम ठोकली ती ठोकलीच! परत ते कधी आलेत की नाहीत सांगणं कठीण आहे. कारण गेले तेव्हां ते मला धड दिसलेही नव्हते.

## ३२. जनरेशन गॅप इज अ मस्ट !

**Little pitchers have bigger ears** या न्यायानं वडीलधाऱ्यांच्या गप्पागोष्टी कान देऊन पण गपचूप ऐकत बसायची माझी लहानपणची सवय. एकदा अशाच शिळोप्याच्या गप्पा चालल्या होत्या. एका म्हातारबुवांनी लेकाचं कौतुक सांगितलं - 'आमचा बाळू इतका शिकला, हापिसर झाला तरी बापाच्या आज्ञेत असतो'.

'शक्य नाही!' दुसऱ्या एकानं बात फेटाळून लावली - 'आज्ञेत असतो म्हणतां तर तो बावळट तरी असला पाहिजे नाहीतर लबाड तरी! एरवी जनरेशन गॅप इज अ मस्ट!' मला नीटसं कळलं नाही. पण डोक्यात राहिलं.

वर्ष लोटली. मी आणि ध्रुव एकदा सिनेमाला निघालो होतो. 'मधुकर' मधे काही चांगलं पिक्चर लागलं होतं. सहाचा शो. वाटेत समोरून बाबा आले. 'काय रे, कुठं निघालां?' वगैरे झालं. मी सांगितलं, मधुकरला अमका अमका सिनेमा लागलाहे. तो बघायला चाललो.'

'छान' बाबा म्हणाले. 'जरूर बघा. फार सुंदर पिक्चर आहे. मी बघूनच येतोय्.'

दोन पावलं गेल्यावर आम्ही दोघेहि थबकलो. अगतिकपणे एकमेकांकडे पहात राहिलो -

-'भाऊ !'

-'भाऊ !'

अत्यंत भावुकपणे बोलायचं झालं की आम्ही एकमेकांना 'भाऊ' पुकारीत असूं.

क्षणभर थबकून दोघेही मुकाट्यानं वळलो आणि 'सर्कल' मधे दुसराच सिनेमा बघायला गेलो.

बाबांशी आमचा कसला मतभेद, गैरसमज, झगडा, बखेडा वगैरे काहीही नव्हतं. पण जनरेशन गॅप इज अ मस्ट !

## ३३. 'बाई, मला बसायचं परीक्षेला !'

'बाई, मला बसायचं परीक्षेला!'

'परीक्षेला बसायचंय? नंबर काय बरं तुझा?'

'नंबर नाही बाई, मी किनई फार्मच नाही भरला.'

'मग कसं बसता येईल ग तुला? तू असं कर. पुढल्या वर्षी फॉर्म भर. अन् मग परीक्षेला बस हं !' म्हणून बाई आपल्या कामाकडे वळल्या आणि उमेदवार विद्यार्थिनी जरा जरा घुटमळून मुकाट्यानं बाहेर पडली.

तालुक्याच्या गावी मुलींची फायनल परीक्षा सुरू होती. नाशिकहून असि. दिपोटी मिस् मीरा टिळक - आजच्या श्रीमती मीराताई भागवत - आलेल्या होत्या. पहिला पेपर सुरू झाला. सगळीकडे शांत शांत झालं आणि ऑफिसमधे हे नाटक ! बाईंना हसू येत होतं. तेवढ्यात म्हातारी शिपायीण धावत आली - 'अवऽ बाई ! ती गेली ना तिकडे हिरीवर ज़ीव द्यायला !'.

'काय? जीव द्यायला गेली? आधी पळा आणि हात धरून घेऊन या तिला. बाई बोलावतायत म्हणावं.'

बाईंनी तिला कोपऱ्यामधे बसवून घेतली. 'हं इथं बस तू ल्यहायला. दऊत टाक काही आहे का तुझ्याजवळ?'

तशी ती तयारीनं आली होती. दऊत, टाक, शाईची पुडी सारं साहित्य होतं तिच्याकडे. पटकन् जाऊन तिनं शाईही करून आणली. तिला प्रश्नपत्रिका-उत्तरपत्रिका देऊन बाईंनी म्हटलं 'आता सावकाश लिही इथं बसून. काही लागलं तर मला विचार.'

ऑफीसमधे 'ष्टॉफ्' गलबल करू लागला - 'अहो बाई, या वेडीला कशी बसवली तुम्ही परीक्षेला?'

'मग काय मरू द्यायचं होतं तिला?'

घंटा झाली. पेपर देऊन मुली बाहेर पडल्या. त्या साऱ्या तिच्याभोवती. 'बघ आम्ही आपले पेपर दिलें. आता तू दे तुझा पेपर !'

तेव्हा बाईंनी येऊन दटावलं - 'आता चला बघू सगळ्याजणी आपापल्या कामाला. लिहू द्या तिला सावकाश ! मी आणखी दहा मिनिटं दिलीहेत तिला. चला पळा इथून.'

मनसोक्त लिहून झाल्यावर तिनं आपला पेपर बाईंच्या अगदी हातात आणून दिला. स्वच्छ अक्षरात चार पाच पानं लिहिलेली. मजकूर मात्र घोळूनघोळून इतकाच - 'बाई किती चांगल्या. परीक्षेला बसवलं. सासू छळती. नवरा मारतो. मग मी मास्तरीण होणार. बाई चांगल्या. मला बसायचं परीक्षेला.'

## ३४. फसाना उडदू कांपोज़ीटर का

नागरिक छापखाना कैक वर्ष माझा पोटापाण्याचा व्यवसाय होता. त्यापूर्वी तो बाबांचा एक हॉबी-हॉर्स होता. त्याचं खोगीर नि तोबरं सांभाळण्यात ते सतत दक्ष असायचे.

मॅट्रिक सारख्या परीक्षेची पेपर-छपाई माझ्या दृष्टीनं मोठी जोखीम होती. बाबांना ती महान् पुण्यपर्वणी वाटायची. त्या चारसहा दिवसांच्या अवधीत आमचे नेहमीचे कामगार, ज्यादा जॉबवर जमवलेले कंपोझिटर्स, काही आम्ही आणि काही परीक्षाधिकाऱ्यांनी बोलाविलेले पृफ-करेक्टर्स, परीक्षा व्यवस्थापकांची गॅंग या सगळ्यांसाठी बाबांनी फ्री लॉजिंग-बोर्डिंगच खोललेलं असायचं. त्यात आणखी काही महाभागांना एकादश्या, सोमवार,शनिवार सुचायचे. बाबांनी स्वत: अहोरात्र जागून आणि आम्हा सगळ्यांना जागवून ही जबाबदारी चोख सांभाळायची. यामुळे छापखानदार-वर्तुळात बाबा म्हणजे एक सत्पुरूष मानले जायचे आणि इकडे प्रत्यक्ष छपाईकाम काटेकोरपणें वक्तशीर आणि बिनचूक करता करता आमचे नाकीनऊ यायचे. शिवाय अजबसाहेब (म्ह. मी) ज्यास्त कडक आणि कटकट्या असा दुर्लौकिक व्हायचा तो निराळाच. खास उर्दूसाठी औरंगाबादहून एक कळकट कंपोझिटर 'मिय्या' उर्दू टैपासकट तैनात व्हायचा. याला उर्दूखेरीज दुसरी कोणतीच भाषा येत नसल्यानं एक उर्दू आणि एक पर्शियन या दोन पेपरांसाठी तो पोसावा लागायचा.

एकदा एका ग्राहकाला उर्दू मूळचिठ्या छापून घ्यायच्या होत्या. मी त्याला म्हटलं 'उर्दू टाईप नाशिकमधे कुठेच मिळायचा नाही. हवं तर हाच मजकूर आम्ही बाळबोध लिपीत छापून देऊ. नाहीतर आपण सरळ म.लेगावला जाऊन काम करून घ्या. तिसरा मार्ग नाही.' तेव्हा ते 'शिर्कत के मुतमन्नी' मुकाट्यानं वापस चालू पडले.

इकडे बाबांच्या प्रेस्टिजला ढका बसला. 'नागरिक प्रेस' मधून गिऱ्हाईक परत जातं म्हणजे काय?' त्यांनी ताबडतोब एक 'चालू' आणि एक 'हेडिंग' अशा दोन उर्दू केसींची आयात केली आणि मशारतिल्हे मिय्याला कायमसाठी पाचारण केलं.

मिय्या आनंदाने येऊन रूजू झाले. कामाचा तर इथं पुरता आनंद होता. चारसहा महिन्यांनी दहा बारा ओळी करण्याचा प्रसंग यायचा आणि मिय्यांना तर दुसरं काही येतच नव्हतं. मात्र दररोज अगदी वक्तशीरपणे हजर व्हायचे, सगळ्यांना - बाबांपासून दगडू माळ्यापर्यंत प्रत्येकाला - अगत्याने 'अस्सलाम आलेकुम्' करायचे आणि कोपऱ्यातल्या अडणीवर शांतपणे विराजमान व्हायचे. अगदी अलिप्त. बाकीचे सगळे टिंगल करायचे. यांच्या ऐकिवातही तेवढं नसायचं.... काम नाही. पगार चालू. जवळजवळ वर्ष असं गेलं.

एकदा रात्री नवाच्या सुमाराला सहज म्हणून मी एका दोस्ताच्या छापखान्यात गेलो. रात्रपाळी चालली होती. काही अर्जंट जॉब असावा. पाचसहा कंपोझिटर्स कामात गढून गेलेले आणि त्यात आमचे मिय्याही. मी हळूच जाऊन त्यांच्या पाठीशी उभा राहिलो. त्यांचं काम बघून एकदम् उद्गारलो - 'वाह मिय्याजी. तुम्हाला मराठी कधीपासून यायला लागली?'

मिय्यांनी हातातली 'ष्टिक' केसवर ठेवली, 'कॉपी' शांतपणे जाऊन मालकांच्या टेबलावर टाकली, आणि निर्विकार मुद्रेने प्रेसमधून बाहेर 'एक्झिट' घेतली. नाशिकमधे पुन: ते कधीच दिसले नाहीत.

## ३५. चूक कोणाची? सुधारली कोणी? श्रेय कोणाला?

गोष्ट अर्धशतकामागली. माझी आणि जोशीबुवांची दोस्ती नव्यानंच जुळून आली होती. दोघांची लग्नं नुकतीच झालेली, दोघाही नवदाम्पत्यांना एकमेकांचं कौतुक. एकदा जोशीबुवांनी आम्हा उभयतांना आग्रहानं आपल्या घरी नेलं. त्यांचं घराणं त्र्यंबकेश्वरच्या गुरूजींपैकी. पाहुणे ख्रिस्ती आहेत हे बहुतेक त्यांनी घरी सांगितलेलं नसावं.

सुग्रास भोजन, नंतर थोडा आफ्टर डिनर सुखसंवाद. जेवतांना वाढप करणाऱ्या २०-२२ वर्षाच्या एका गृहिणीनं माझं लक्ष वेधून घेतलं होतं. सुस्वरूप, शालीन, मर्यादशील मुलगी. जोशीबुवांना मी सहज विचारले 'ही मुलगी कोण?'

'ही ताई. माझी बहीण.'

'इथंच असते?'

'कसं अन् काय सांगावं.' जोशीबुवा जरा खिन्न होऊन सांगू लागले, 'इतकी चांगली मुलगी पण नवरा वागवत नाही!'

'का बरं? एवढं काय घडलं?'

'तशी त्याची चूक नाही म्हणा. पण आमच्या वडलांचं तोंड! काही तरी वेडंवाकडं बोलून त्यांनी जावयीबुवांचा अपमान करून ठेवलाय्. तेव्हापासून त्यांच्याकडलं कोणी फिरकलंच नाही इकडे.'

मी आणि जोशीबुवा दोघे पंचविशीतलेच. त्यांना काही शिकवायचा मला अधिकार नव्हता. तसा माझा विचारही नव्हता. तरीपण बोलून गेलो -

'मी एक विचारतो जोशीबुवा, तुम्ही स्वत: ताईसाठी काय केलंय्?'

'मी काय करणार? वडलांपुढं बोलता थोडंच येतं?'

'ते काही असू द्या. माझं जरा ऐका. वडिलांचं राहू द्या. तुम्हीच एकवार जाऊन जावयाची भेट घ्या ना. त्यांची क्षमा मागा. चुकलं म्हणा. अहो लाचारी स्वत:साठी करू नये, दुसऱ्यासाठी करण्यात काहीही कमीपणा नाही. काय होईल? फार तर नाही म्हणेल, टाकून बोलेल. पण करून तर पहा. निदान बहिणीसाठी काही केल्याचं समाधान तर मिळेल.'

वर्ष लोटली. 'यथा काष्टं च काष्टं च' मी आणि जोशीबुवा दूर दूर वहात चाललो. हा संवाद तर मी विसरूनही गेलो. आणि एका रम्य प्रात:काळी दारात जोशीबुवा दत्त म्हणून उभे -

'बरं का अशोकराव, तुम्ही आमच्या ताईचं कोटकल्याण केलंत. मुद्दाम आज आलो तुमच्याकडे.'

'अरे! मी काय केलं? मला तर तुमची ताई ठाऊकही नाही.'

'नाही कशी? तुम्हीच नाही का मला सल्ला दिलात जावयाला भेटा म्हणून? तेव्हा ते नगरला टेलिफोन ऑपरेटर होते आणि मी नाशिकला. रातोरात टेलिफोनवर त्यांना

गाठलं. त्यांची माफी मागितली. म्हटलं - 'मास्तरांचं काय मनाला लावून घेतां? आम्ही आहो ना तुम्हाला?'

आणि गडी याचीच वाट पहात होता. स्वत: त्र्यंबकेश्वरला येऊन तांईला घेऊन गेले. सुखानं संसार करताहेत दोघं! परवा मुंज आहे तिच्या थोरल्याची. ताईनं आवर्जून सांगितलंय तुम्हाला. जरूर यायचं, दोघांनी.'

## ३६. खुजा केवढ्याला घेतला?

आमची आजी - म्हणजे त्या प्रख्यात लक्ष्मीबाई नव्हत, त्या आजीबाई. आणि आजी म्हणजे आमची माय-आजी विठाबाई सरोदे. ही मुंबईला मिशन मराठी शाळेतून हेडबाई म्हणून रिटायर झालेली. जन्म मुंबईत काढलेला. पण लेकीकडे नाशिकला आल्याबरोबर नाशिकची झाली. इथली बोलभाषा शिकून गेली.

आजीला बाजार करण्याची भारी आवड. साऱ्या गावात पायपीट करून चौदा आण्यांची वस्तू बारा आण्यांत आणण्याचं तिचं कसब काही अजबच होतं. आम्ही कुणी काही आणलं की तिनं विचारावं - 'केवढ्याला रे आणलंस?' आणि जबाब 'आठ आणे' मिळाला की म्हणावं, 'मी चार आण्यांत आणलं असतं!'

ही तिची अस्मिता अगदी हातपाय थकल्यावर आणि बाजारहाट बंद झाल्यावरही शाबूत होती. एकदा मी एका हातगाडीवर एक छोटासा नक्षीदार खुजा खरेदी केला. दहा आणे दिले. घरी येताच आजी याची किंमत किती करणार याचा अंदाज घेऊन मी तिला म्हटलं - 'आजी, बघा हा खुजा. अडीच आण्याला मिळाला.'

आजीनं खुजा हातात घेतला, उलटासुलटा करून पाहिला, खणखण वाजवून पाहिला आणि कडोसरीचे अडीच आणे काढून म्हटलं - 'छान मिळाला. पटकन् जाऊन माझ्यासाठी एक घेऊन ये.'

- आणि माझी पाठ वळताच हसतहसत सूनबाईला म्हणते, 'मोठा आलाय शाणपण शिकवायला! म्हणे अडीच आण्याला घेतलान्. पाच आणे तरी पडले असतील.'

## ३७. जोडधंदा

तसा तेव्हा मी सुखवस्तु होतो. साडेतीन रूपये रोज म्हणजे त्या काळचा बऱ्यापैकी पगार. माझ्या बरोबरचे - म्हणजे साडेतीन रूपये रोज घेणारे - दोघे मित्र काहीतरी जोडधंदे करून पिठात मीठ घालायचे. त्यांचं बघून मलाही स्फूर्ती झाली. या दोघांनी दोन जोडधंदे घरपोच आणून दिले.

एकानं एक सुटाबुटातला कळकट म्हातारा आणला. ओळख करून दिली. 'हे आमचे बेंजामीन शेट'. बेंजामीन साहेबांनी प्रपोजल आणलं होतं, ते म्हणाले,

'टिळकसाहेब, आपुण बी ख्रिश्शन आहात'.

'हो आहे. मग?'

'आपल्याला पर्मिट सहज मिळल. तेवढं घेऊन तुम्ही आमच्याकडे ठिवायचं. मी तुम्हाला महिना शंभर रूपये देईल... अगदी दर पहिल्या तारखेला बिनबोभाट घरी आणून देईल. अण् कधी काही गर्बड झालीच तर तुम्ही खुशाल अर्ज करायचा - माझं पर्मिट चोरीला गेलंय. मेहरबानीने ट्रुप्लेट द्यावं'.

'पण हे परमिट कसलं? आणायचं कुठून? मला काहीच माहीत नाही.'

'अहो अगदी सरळ व्योवार आहे. कलेक्टर सायबाकडे अर्ज करायचा. बघा मी फार्म आणलेलाच आहे. तेवढा भरून, सही करून द्यायचा. मग कलेक्टरसाहेब भेटीला बोलावतील. म्हणतील - 'दारू पीना बहोत बूरा है । तुम क्यूं पीते बाबा? ये आदत छोड देव.'

मग आपण अगदी गयावया करून म्हणायचं - 'सायेब आपलं दारूबिगर होतच नाही'. साहेब म्हणतील 'सिविलसर्जन के सामने खडा रहेगा?' आपण नुस्ती मुंडी हलवायची.

सिव्हिल सर्जनकडे बी हेच नाटक. एवढं झालं की लगेच पर्मिट भेटतं. मी यतो बरोबर. चला.'

पटलं. ठरलं. मग मी सहज चौकशी केली - कलेक्टर साहेब आहे कोण?

मिस्टर ई. डब्ल्यू. पेरी! बाप रे! हे पेरीसाहेब तर बाबांचे चाहते दोस्त! त्यांनी बाबांना सांगितलं तर?' आणि सिव्हिल सर्जन डॉ. मोने. हे तर बाबांचे मित्र. कॉलेजमधले वर्गबंधु! निकाल लागला! हा धंदा रद्द करून दुसऱ्याच्या मागे लागलो.

दुसरं प्रपोझल आलं ते भाऊ तांगेवाल्याचं. त्याचा तांगा अण् घोडा तो चारशे रूपयांत विकत द्यायला तयार होता. शर्त एवढीच की तांगा हाकायला त्याला ठेवायचं.

पटलं. जमलं. दारात तबेला नसला तरी तांगा ठेवायला आणि घोडा बांधायला जागा होती. सौदा पटला. गुरूवारी त्यानं तांगा घोडा ताब्यात द्यायचा आणि दीडशे रूपये घ्यायचे. बाकी रक्कम सोमवारी.

मग मी मीराताईकडून दोनशे रूपये घेतले. पांडू भागवतानं शंभर दिले. शंभर माझ्याजवळ होतेच. सौभाग्यवतीला आणि आजींनाही हा व्यवहार पसंत नव्हता. त्या पांढरपेश्या! साहस त्यांना कुठलं पटायला! पण त्यांनी फारसा विरोध केला नाही.

गुरूवार आला आणि गेला. भाऊ काही आला नाही. रविवारपर्यंत वाट पाहिली. पत्ता नाही. आणि सोमवारी आला तो रडतच आला - 'साहेब त्या चंदू पहाड्यानं तीनशे रूपयांत तांगाय् घेतला न् घोडाय् घेतला. आता काय करू?'

'जाऊ दे. तीनशे रूपये तरी मिळाले ना?'

'कुठले तीनशे साहेब! पाचपंचवीस रूपयाची दारू पाजली अन् कागद करून टाकला.'

यावर तिसरं-चौथं प्रपोझल कधी आलंही नाही आणि मी घेतलंही नाही.

## ३८. काकांना मामा बनवणे !

प्रिन्सिपॉल भा.ल.पाटणकरांना सारं नाशिक मामासाहेब म्हणून ओळखायचं. आम्हा भावंडांचे मात्र ते काका होते. बाबांचे बालमित्र. स्वभावानं प्रेमळ. व्यवहारात सरळ. पण शिस्तीचं वेड जरा अधिकच. 'मित्राच्या मुलाला झुकतं माप दिलं' असा कुणाचा बोल नको म्हणून सदा सावध. माझ्या बाबतीत ज्यास्तच कडक.

आमचे बी.ए. चे फॉर्म्स भरण्याची गडबड चाललेली. रू.४५ ताबडतोब भरायचे होते. बाबा गावाला गेलेले. आमच्या छापखान्याचे शे-दोनशे रूपये कॉलेजकडे नेहमी असायचेच. बाबांनी जाताना मला सांगितलं 'पाटणकरकडून पैसे घे आणि फॉर्म भरून टाक.'

ऑफीसमधे गेलो. अकौन्टट शिंगवेकर उर्फ 'सर'. त्यांनी बजावलं 'फी भरल्याशिवाय फॉर्म घेता येणार नाही.'

'मला सांगा. हा दंडक सर्वांकरता आहे की खास माझ्यापुरता आहे?'

'खरा म्हणजे तुझ्यासाठीच आहे. फी नसली तर टिळकचा फॉर्म घ्यायचा नाही, असंच प्रिन्सिपॉलसाहेबांनी मला बजावून सांगितलं आहे.'

'बरं. मग चेक दिला तर चालेल का?'

'चालेल. प्रिन्सिपॉलच्या नावे चेक दे.'

गावात गेलो. पीपल्स को-ऑप., बँकेत पाच रूपये भरून खातं उघडलं. पंचेचाळीस रूपयांचा चेक प्रिन्सिपॉलच्या नावे दिला. फॉर्म मार्गी लागला.

चार दिवसांनी प्रिन्सिपॉलसाहेबांचं बोलावणं आलं. तसा मी निरागस मुद्रा धारण करून हजर झालो. मामासाहेब रागारागाने पिंजऱ्यातल्या वाघासारखे येरझाऱ्या घालीत होते. मला पहाताच कडाडले -

'काय रे? हे तू काय केलंस?'

'कुठं काय केलं?'

'तू खोटा चेक दिलास-'

'हो, दिला खरा.'

'बाहेर असं केलंस तर तुरूंगात जाशील!'

'पण बाहेर मी असं करणारच नाही.'

'म्हणजे तू माझा ॲड्व्हांटेज घेतोस!'

'हो घेतो. आणि तुमचा ॲड्व्हांटेज मी घेणारच.'

सीन अजब होता. काय बोलावं मामांना सुचत नव्हतं आणि मी साळसूदपणे शांत उभा होतो.

दुसऱ्या दिवशी मामा बाबांकडे तक्रार घेऊन आले. बाबांना सारा किस्सा माहीतच होता. त्यांनी सरळ मामांच्या टकलावर दोन्ही हात ठेवले आणि वर म्हटलं 'अरे अरे! इतका तापू नको.'

मामा रागे रागे काहीतरी सांगतच होते. पण काही एक ऐकून न घेता बाबांनी सारा मामला चहाच्या कपात बुडवून टाकला.

## ३९. पहला पण्डित

काही भली माणसं माझं नाव लिहिण्याचा प्रसंग आला तर आधी श्री.,रा.रा.,मि. असलं काही न लावता 'पंडित' लावतात. लावोत बिचारे. पण मी काही खरा पंडित नव्हे. साहेबलोकांना मराठी शिकवणारांस पंडित म्हणण्याची प्रथा आहे आणि ते क्वालिफिकेशन मी मिळवलेलं आहे. पण ते कुणी नावामागे जोडीत नाही. पण मी आहे राष्ट्रभाषा पंडित. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेच्या पंडित परीक्षेत पहिल्या बॅचमधे उत्तीर्ण झालेल्या चौघांमधला एक. पदवी तशी लहानच. पण एकदोन वर्ष मी ती आवर्जून

वापरत होतो. कारण मी पहिला पंडित होतो. नंतर ती उपाधी कायम चिकटली. म्हणजे इतकी पक्की की कुठे काही सभासंमेलनामधेही मी पंडितजी म्हणून पुकारला जातो.

हिंदीचं माझं ज्ञान किंवा व्यासंग काय म्हणाल ते अगदीच तोकडं आहे. मी कधी हिंदी बोलायला लागलो म्हणजे माझी कन्यासुद्धा हसत सुटते. अशा भांडवलावर मी पहला पण्डित कसा झालो सांगू?

१९५० साली महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेनं पण्डित ही 'उच्च श्रेणीची' परीक्षा सुरू केली. सुरवातीला 'परीक्षार्थी' हाकारून गोळा करावे लागले. एकूण ५/२५ डोकी मिळाली. त्यांत नाशिककर चौघे. कडेपूरकर गुरूजी म्हणजे वस्ताद प्रचारक! मी नाही नाही म्हणत असताही मला घोड्यावर बसवलंच. त्यांचा शब्द मोडायचा नाही म्हणून तयार झालो. अभ्यासाची सवयही नव्हती आणि सवडही नव्हती. (खरं म्हणजे आवडच नव्हती). गुरूजी जीव तोडून शिकवायचा यत्न करायचे पण आमच्या गमजाच चालायच्या - 'बलिहारी गुरू आपनई गोविंद दियो बताय' सुधारून आम्ही 'बलिहारी गुरू आपनई बिनु अभ्यास परीक्षा पास कऱ्यो' केलं होतं.

परीक्षा सुरू झाली. पेपर सकाळी १०॥ ला. मला वाटलं असेल ११ वाजता. आणि त्याच भरवशावर प्रत्येक पेपरला अर्धा घंटा उशीरा गेलो. अखेर शेवटच्या पेपरला सुपरवायझर येऊन रागावून गेले. मी म्हटलं 'हेच पहिल्या पेपरला तरी सांगायचं!' अनिवार्य (कंपल्सरी) उर्दूचा पेपर. सगळी तयारी झाली. पेपर वाटण्यात आले. पण उर्दू म्हणजे आधीच RIGHT TO WRONG. त्यात पेपर सायक्लोस्टाईल्ड. कुणाला वाचताच येईनात. अखेर कडेपूरकर सरांना साकडं घातलं. 'सर पेपर वाचून दाखवा, नाहीतर आम्ही चाललो घरी!' चौघंही उठलो. तेव्हा सरांनी पेपर वाचून दाखवला, आम्ही तेवढा बाळबोधीत लिहून घेतला. कसं आणि काय लिहिलं माझं मला (तेव्हा आणि आताही) ठाऊक नाही, पण पास झालो. मौज अशी की परीक्षेत जे नापास झाले ते सारे याच विषयात.

निबंधाचा पर्चा. 'आपल्या आवडत्या लेखकाचा परिचय' हा विषय. मला काय सगळेच लेखक आवडते! कारण परिचय एकाचाही नाही. पण हिंमत केली. 'गुलाम अिष्की' म्हणून एक काल्पनिक साहित्यिक उभा केला. त्याच्या नावावर खूप गप्पा मारल्या. काही गद्य-पद्य अवतरणंही ठोकून दिली. आणि शेवटी म्हटलं 'अिष्कीजींनी एवढं लेखन केलं पण मी त्यांना स्वतंत्र प्रतिभेचा लेखक म्हणणार नाही कारण त्यांच्या

साऱ्याच लिखाणावर रशियन तत्वज्ञ गुस्टाफ गोलम् (हाही काल्पनिकच) याची दाट छाया दिसते.'

शेवटला बागुलबोंवा म्हणजे ''मौखिक'. पण माझं नशीब मोठं खरं. पाठ्येतर कवितेमधे 'हुमा' शब्द आला. सारेजण इथं गडबडले. पण आधल्या रात्रीच मी मजेनं शब्दकोश चाळीत बसलो होतो. त्यात मला 'हुमा' गवसली होती.

हुमा ही एक कविकल्पनेतली पक्षिणी. हिची सावली ज्याच्या डोक्यावर पडेल त्याला राजपद प्राप्त होतं. मला वाटलं हिचीच सावली माझ्या डोईवर पडली असावी, म्हणून मला हे पंडितपद प्राप्त झालं.

## ४०. बाई तू किती भाग्याची !

५० वर्ष झाली. नवीन साल उजाडत होतं तेव्हाची गोष्ट. नवीन वर्षाचं देऊळ सुटलं आणि गायकवाड बंधूंनी आम्हा दोघांना आग्रहपूर्वक जेवायला घरी नेलं. वॉल्टर आणि विल्यम गायकवाड (नावं आडनावं काल्पनिक) दोघे सख्खे भाऊ आणि सख्खे साडू. साडू माझेसुद्धा जरा दूरचे. ती फ्यामिली श्रीमंत, सुशिक्षित, उच्चभ्रू. पुढे ती 'ऽमॅर्केत' सेटल झाली. ५१ साली मुंबईतच होती. मुंबईच्या मानानं त्यांचा फ्लॅट ऐसपैस, फर्निचर, रेडिओ वगैरे सारा थाट. मुलं लहान आणि घरात म्हातारी आई - ८५ वर्षांची. एवढी खानेसुमारी.

१॥ वाजून गेला. मी ड्रॉईंगरूममधे पेपर चाळीत एकीकडे जेवणाची वाट पहात एकटाच. दोघे मेजवान कुठे गेलेवते ठाऊक नाही. मिसेस टिळक लेडीज कंपार्टमेंटमधे गप्पाटप्पांत रंगलेल्या. तेवढ्यात धाकटे बंधु मि. विल्यम माझ्याजवळ आले, 'मिस्टर टिळक, जरा त्या रूममधे येता का? वॉल्टरदादा पण बोलावतोय.' त्या खोलीत गेलो. दोघांचा ड्रिंक्सचा बेत चालला होता - रंगलाही होता. दोघे मला ऑफर आणि मग आग्रह करू लागले. मी म्हटलं 'तुमचं चालू द्या. मला नको!'.

'नाही मिस्टर टिळक तुम्ही घ्यायलाच पाहिजे'.

'नको हो, मी कधीच घेत नाही.'

'असे कसले प्रोफेसर तुम्ही? ड्रिंकला नाय म्हणतां? एकादे दिवशी +++ वर लाथ खाऊन कॉलेजबाहेर पडाल!'.

मला अर्थातच असला आग्रह फारसा आवडला नाही. पण वॉल्टरबाबा आता 'टाईट' झालेत त्यांच्याशी न बोलणं बरं, इथपत विवेक केला.

विल्यमबाबाचा हल्ला दुसऱ्या बुरूजावर होता - तो समजुतीने म्हणाला - 'हे बघा ब्रदर, तुम्ही नसला घेत तर आम्हालाही लाज वाटती. थोडीतरी घ्यायलाच पायजे'.

'नको. तुम्हाला लाज वाटतं अंसेल तर मी आपला तिकडे जाऊन बंसतो. तुमचं चालू द्या - अगदी लाज सोडून चालू द्या!'

सगळ्याच प्रकाराचा मला उबग आला होता. पण काही इलाजच नव्हता. तोंड दाबून बुक्क्यांचा मार खात खातच जेवायला बसलो. दोघे भाऊ आता गप झाले होते. त्याचं सारं ध्यान बकाबका जेवणाकडे होतं. रगडून जेवल्याबरोबर दोघे सतरंजीवरच आडवे झाले, घोरूही लागले.

कधी इथून निघतो असं मला झालं होतं. दुपारची गाडी धरायची असं निमित्त सांगून निघालोच. आणि अगदी निघता निघता एका क्षणात माझ्या मनस्तापाचं समूळ प्रक्षाळण झालं -

निरोप देता देता म्हातारी आई मिसेस टिळकला कवटाळून रडत फुंदत म्हणाली - 'बाई तू किती भाग्याची, तुझा नवरा प्येत नाही!'